220

रे. डॉ. इ. फेअरबँक, एम्. ए., डी. डी.

यांचें

# संक्षिप्त जीवन चरित्र

व

# आठवणी

कै. म. म. द. का. गोवधांष. ग्रंथ संग्रह

लेखक व प्रकाशक :--

रे. दा. आ. पटेकर

M 220 Fai/Pat 684

प्रती-- १०००
ता.-- १२ फेब्रुवारी १९६३

मूल्य ६२ नये पैसे

Presented to Shri Potdar, the vice-chancellor of the Poona University from Rev. D.A. Patekar, as a token of love for the 150 th anniversary of the A.M. Mission on 12-th of Feb 63.

D.A. Patekar

अ/६६०४ 220

684

684

52

डॉ. एडवर्ड फेअरबँक, एम्.ए., डी.डी.

Dr. E. Fairbank, M.A., D.D.



वि. प्र मंडळी, पुणे
कै. स. म. डॉ. द. घ. पेंढारकर
दाखल क्रमांक 684
ग्रंथांक 220/Fai-Pat.
किंमत ........ तारीख 14-11-92

## अर्पण पत्रिका

रे. आर. डब्ल्यू. फेअरबँक व मिसेस् एम्. फेअरबँक यांस—

अमेरिकन मराठी मिशनमध्यें, विशेषत: वडाळें प्रांतांत मातापित्याबरोबरच व सासूसासरे यांचे बरोबर व त्यांचे पश्चात् आपण अमोल प्रभुसेवा करून लोकप्रियता प्राप्त केली आहे.

आपली हुशारी, तडफदारी, कार्याची कळकळ, वाङ्मय प्रेम या गुणावर मुग्ध होऊन रे. डॉ. इ. फेअरबँकसाहेबांचे चरित्र आपणांस समर्पण करीत आहे.

—दा. आ. पटेकर

शि. प्र. मंडळी प. म. द. भा.
684

# प्रस्तावना

७ आक्टो. १९६२ रोजीं चर्चमधील उपासना संपल्यावर रे. दा. पटेकर यांनीं मला एका महान् पेचांत टाकले. ते म्हणाले, " मी रे. डॉ. इ. फेअरबँकसाहेबांचें चरित्र लिहिलें आहे व त्या चरित्राला तुम्ही प्रस्तावना लिहावी अशी माझी इच्छा आहे."

पेचांत पडण्याचें कारण म्हणजे रे. डॉ. इ. फेअरबँक यांच्याविषयीं मला स्वतःला माहिती नव्हती आणि दुसरें कारण म्हणजे मी प्रस्तावना लेखनास पूर्णतः अयोग्य आहे ही माझ्या मनाची कल्पना ! पहिला पेंच रे. डॉ. इ. फेअरबँक यांचें चरित्राचें हस्तलिखित वाचून दूर झाला, पण दुसरा ?

मी कादंबरीकार, नाटकें आणि लघुकथा लेखक असलों, तरी माझा मूळ पिंड टीकाकाराचा आहे, व टीकाकारानें प्रस्तावनेच्या भानगडींत मुळींच पडूं नये असा दंडक आहे.

हीच इच्छा जर दुसऱ्या कोणी प्रगट केली असती तर मी साफ नकार देऊन मोकळा झालों असतों. पण माझ्या ख्रिस्तवासी वडिलांचे व रे. दा. आ. पटेकर यांचे साताऱ्यांतले जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध नजरेपुढें असल्यामुळें मी तें धाडस करूं शकत नाहीं. रे. पटेकर यांचा माझ्यावर हक्क आहे आणि म्हणूनच मी प्रस्तावना लेखनास तयार झालों.

चरित्रलेखन ही एक अवघड बाब आहे. "ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी" या म्हणीला जागून चरित्रात्मक लेख लिहिले जातात अशी पुष्कळांची समजूत आहे. ही समजूत जमेस धरून मी रे. डॉ. इ. फेअरबँक यांच्या चरित्राचें हस्तलिखित वाचूं लागलों. मला कांहीं निराळंच वाटूं लागलं या चरित्रापासून घेण्यासारखं, शिकण्या-सारखं, शिकविण्यासारखं, स्फूर्ति मिळण्यासारखं, अनुकरण करण्यासारखं पुष्कळ आहे. थोडक्यांत म्हणजे हें चरित्र मार्गदर्शन करणारं आहे.

चरित्राची भाषा सुटसुटीत, सोपी आणि बाळबोध आहे. प्रसंगाची वर्णनेंसुद्धां आत्मियतेनें आणि जिव्हाळ्यानें केली आहेत. ज्या ज्या व्यक्तींनी आपले अनुभव सांगितले ते उत्तम तऱ्हेनें गुंफून हा गोफ वाचकापुढें सादर करण्यांत रे. पटेकर यशस्वी झाले आहेत यांत शंका नाहीं.

सात समुद्र ओलांडून हा गोरा मिशनरी येतो काय, ख्रिस्ताच्या सेवेंत स्वतःला वाहून घेतो काय आणि जनसेवेंत रमून परकीयांवर प्रेम करतो काय !

अशा चरित्रांचा आपल्या वाङ्मयांत अभाव आहे, अशी निष्काम सेवा करणाऱ्यांची चरित्रें लिहिण्यांत यावीत आणि त्यापासून ख्रिस्ती जनतेनें बोध घ्यावा याची अत्यंत गरज आहे. ही गरज रे. दा. आ. पटेकर यांनीं अंशतः भागविली आहे म्हणून समाधान वाटतें.

महाराष्ट्रांतील मंडळ्या या पुस्तकाचें स्वागत करतीलच अशी अपेक्षा करून मी ही प्रस्तावना संपवून आपणांस चरित्र वाचनासाठीं मोकळें करतो.

**शांताराम ना. कांबळे**, बी.ए.एस्.टी.सी.
साहित्यरत्न ( प्रयाग )
अहमदनगर.

# लेखकाचे दोन शब्द

## अमेरिकन मराठी मिशन, वडाळा प्रांत आणि फेअरबँक घराणें

पश्चिम भारतांत किंवा ज्याला सांप्रत "महाराष्ट्र" म्हणतात, त्यांत अमेरिकन मराठी मिशन हें अद्यावत प्रॉटेस्टंट मिशन होय. ह्या मिशनची संस्थापना मुंबईत इ. सन १८१३ सालीं झाली. श्री ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाची घोषणा करण्याच्या स्तुत्य उद्देशानें अमेरिकेहून एकामागून एक अशा टोळ्या अनेक अडचणींना तोंड देऊन मुंबईंत येऊन थडकूं लागल्या. आगबोटीनें आज तीनचार आठवडे लागतात. तो प्रवास करावयास या आद्य मिशनरी कंपूंना १८ ते २२ आठवडे लागत. सुमारें २० वर्षांनंतर एक टोळी अहमदनगरला येऊन ठेपली व त्यांनीं मिशनची शाखा निर्माण केली. पायींपायीं, बैलगाड्यांतून, घोड्यांवर बसून त्यांनीं शुभवार्तेची कार्यप्रसारक सेवा केली व ती फार फलदायक झाली.

मराठी मिशनच्या कार्य–कारभारासाठीं महाराष्ट्रांत १२ प्रांतांची निर्मिति करावी लागली. त्यांत वडाळा प्रांत हा सर्वांत मोठा व कार्यप्रभावी असा गणला जातो. खेड्यापाड्यांतील शैक्षणिक कार्य, लहानमोठ्या मंडळ्यांची संस्थापना, एक यशस्वी हायस्कूल व नामांकित दवाखाना हीं ज्या प्रांतांत दिसून येतात असा दुसरा कोणताच प्रांत मराठी मिशनच्या १५० वर्षांच्या इतिहासांत आढळून येत नाहीं.

या प्रगतींत परमेश्वराचा हात व आशीर्वाद तर आहेच आहे, परंतु त्यांत फेअरबँक घराण्याचें प्रेमपूर्वक व आस्थापूर्वक श्रमही आहेत. जे १२ प्रांत होऊन गेले त्यांत एकाही प्रांतामध्यें एकाच मिशनेरी घराण्याच्या एकामागून एक अशा तीन पिढ्या होऊन गेलेल्या नाहींत. डॉ. सॅम्युएल बी. फेअरबँक हे या प्रांताचे मूळपुरुष व संस्थापक, त्यांचे चिरंजीव डॉ. हेन्री व डॉ. एडवर्ड फेअरबँक ह्या द्विबंधूंची दुसरी पिढी आणि रे. रॉबर्ट फेअरबँक यांची तिसरी पिढी.

या प्रांतांत दुसरे आणखी लहानमोठे मिशनरी रे. फेल्ट, रे. क्लार्क, रे. मोल्टन आणि रे. गायकवाड होऊन गेले. परंतु डॉ. एडवर्ड फेअरबँकची कामगिरी अनेक दृष्टींनीं फारच मौल्यवान् व उत्तेजनदायक अशी झालेली आहे म्हणून त्या विभूतीच्या अनेक गोष्टींतून कांहींकांहीं गोष्टींचें संकलन करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. १९६३ सालच्या फेब्रुवारी १२ तारखेला मराठी मिशनची १५० वी जयंती व्हावयाची. त्यावेळीं डॉ. एडवर्ड फेअरबँकच्या जीवनचरित्राचें स्मरण द्यावें हा या लेखनाचा मूळ हेतु आहे.

१९३७ सालीं उघडलेलें फेअरबँक–जेम्स फ्रेंडशिप मेमोरियल हॉस्पिटलचा वाढदिवस पाळण्यासाठीं १९५७ सालीं वडाळा–मिशन येथील दवाखान्यांत एक प्रसंग झाला. रे. डब्यू. क्यू. स्वार्टसाहेब अध्यक्षस्थानीं होते. त्या प्रसंगाच्या कार्यक्रमांत श्री. त्रिंबकराव मोटे पाटील आपल्या भाषणांत म्हणाले, "ज्या जोडप्यानें हा दवाखाना बांधण्यास पैसे मिळवून दिले त्यांचें ह्या दवाखान्यांत लावलेलें चित्र पाहून समाधान वाटतें. पण त्यांचें चरित्र छापून प्रसिद्ध केल्यास राहिलेली उणीव भरून निघेल."

प्रसंग आटोपल्यावर स्वार्टसाहेब मला म्हणाले, "डेविडराव, डॉ. फेअरबँकसाहेबांचें चरित्र लिहिण्याचें तुम्हांला आव्हान आहे. तें तुम्ही लिहूं शकाल. कारण तुमचा त्यांच्याशीं बराच संबंध आलेला आहे. तुम्ही चरित्र छापलें तर ह्या पुस्तकाच्या ५०० (पांचशें) प्रती मी प्रांतांत खपवीन, इतके ते लोकप्रिय आहेत." त्यांच्याजवळ बसलेले शंकरराव मिसाळ यांनीं साहेबांच्या म्हणण्यास दुजोरा दिला. यावर मी विचार करून सांगेन असें उत्तर दिलें.

मग मी हा विचार रे. शां. ल. साळवी, पुणें यांस कळविला तेव्हां त्यांनीं मला पत्रद्वारें उत्तर दिलें कीं, डॉ. इ. फेअरबँकसाहेबांचें चरित्र सांप्रतच्या ख्रिस्ती व ख्रिस्तीतर जनतेपुढें सादर करण्याचा तुमचा उद्देश स्तुत्य आहे. मजसारख्या दुबळ्या तरुणाला त्यांनीं जी गति दिली ती अतुल्य होय. तसेंच आमचे मित्र श्री. दे. ना. टिळक, अॅडव्होकेट नाशिक म्हणतात, "आम्ही ज्ञानोदयांत सुचविल्याप्रमाणें अशा मिशनरींची छोटीछोटी चरित्रें लिहिली तर पुष्कळ कार्य झालें असें आम्ही समजूं."

आणखी खुद्द डॉ. इ. फेअरबँकसाहेब, स्वर्गवासी डॉ. ए. एच्. क्लार्कसाहेब, रे. आर. डब्ल्यू. फेअरबँकसाहेब आणि इतर सुशिक्षित मंडळी यांनीं सम्मति दिली म्हणून उत्साह वाढला. नंतर प्रार्थना करून या कामास लागलों.

या कामीं ज्यांनीं मला माहिती पुरविली त्यांचा मी फार आभारी आहे. त्यांची नांवें (चरित्र) आठवणी वाचीत असतां आढळून येतील.

या पुस्तकाचें हस्तलिखित तपासून पाहिल्याबद्दल आणि कांहीं उपयुक्त सूचना केल्याबद्दल श्री. डी. जी. दुसिंग, वडाळा–मिशन, श्रीमती क. जी. गायकवाड, बी. ए. बी. टी. पुणें, श्री. अ. ससाणे, बी. ए. बी. टी. अहमदनगर, श्री. सो. स. ठोकळ अहमदनगर, श्रीमती इं य. साळवे, बी. ए. बी. टी. वाई, रे. डी. डी. पटेकर, बी. ए. बी. डी. सोलापूर, श्री. सं. वि. गायकवाड, साहित्यप्राज्ञ नेवासा, रे. र. आ. हिवाळे, बी. ए. बी. टी. बी. डी. एम्. टीएच. (प्रिस्टन) नागपूर, रे. शां. ल. साळवी, पुणें, रे. ना. आ. हिवाळे, मुक्ति–मिशन, केडगांव यांचा मी ऋणी आहे, पण शां. ना. कांबळे, बी. ए. साहित्यरत्न (प्रयाग) अहमदनगर यांनीं पुस्तकाला प्रस्तावना लिहिली म्हणून मी त्यांचा फार आभारी आहे.

पुस्तक छपाईस मि. एस्. इ. स्मिथ २० रु., डॉ. व मिसेस देवधर १५ रु., डॉ. कोकाटे, डॉ. व मिसेस आब्राहाम, मेजर के. एन्. उजगरे, रे. र. आ. हिवाळे, मि. एस्. जे. मलेलू, श्री. अक्षय महंती यांनीं प्रत्येकी १० रुपये आणि श्री. गो. मोटे, डॉ. के. एल्. कोल्हटकर, डॉ. व मिसेस एम्. गायकवाड, कु. ज्यो. त्रिभुवन वकील, कु. इं. य. साळवे, रे. व मिसेस एम्. राजनूर, डॉ. पी. जी. भागवत, श्री. डी. के. दानवे, श्री. बैरागी, श्री. डी. जी. नाईक, डॉ. व मिसेस मॅकेडॉन, मिसेस एम्. आर. पंडीत, श्री. इ. आर. साळुंखे, रे. शा. तु. नवगिरी, सौ. आ. आ. त्रिभुवन यांनीं प्रत्येकी ५ रु. व वडाळकर, नगरकर आणि इतर ठिकाणच्या मित्रांनीं कांहीं मदत केली म्हणून मी त्यांचाहि आभारी आहे.

तसेंच अमेरिकन मराठी मिशनच्या ख्रिस्ती वाङ्मय कमिटीच्या शिफारशीवरून जनरल कौन्सिलनें थोर मनानें या थोर मिशनरीच्या चरित्रासाठीं १०० रु.ची देणगी दिली. या त्यांच्या स्तुत्य कार्याबद्दल मी त्यांस धन्यवाद देतों.

आमचे मित्र अहमदनगर राष्ट्रीय मुद्रणालयाचे मॅनेजर श्री. रा. द. आडेप यांनीं अमेरिकन मराठी मिशनच्या १५० वर्षांच्या उत्सवाच्याप्रसंगीं हें पुस्तक योग्य दरांत वेळे–वर चांगल्याप्रकारें छापून दिलें म्हणून मी त्यांचे आभार मानितों.

रे. डॉ. इ. फेअरबँकसाहेबांचें चरित्र मोठें आहे. अनेकांना व मला त्यांच्याविषयीं पुष्कळ माहिती आहे. पण अपरिहार्य कारणामुळें हें चरित्र संक्षिप्त छापलें आहे. यांत मुद्रणाचे थोडे दोष असतील तर त्यांकडे कानाडोळा करावा पण जें आहे तें गोड व मान्य करून घ्यावें अशी नम्र विनंति करून हे दोन शब्द पुरें करितों.

आपला नम्र

**दा. आ. पटेकर**

## अनुक्रमणिका


### भाग १ ला

१ जन्मस्थळ व काळ
२ एडवर्डचें बालपण
३ जुन्या करारांतील देखावे (चित्रें)
४ डॉ.एस्.फेअरबँक यांचा संकटांतून बचाव
५ एडवर्डची खेळाडूवृत्ति
६ त्यांचें शिक्षण १) भारतांत २) अमेरिकेंत
७ एडवर्डचे लग्न व भारतांत आगमन
८ वडाळयाचा अल्प परिचय
९ नवीन मिशनरींचा मार्गदर्शक
१० निष्णात भाषा पंडित
११ समेटाचें कार्य
१२ शैक्षणिक सेवा
१३ लोकांची आर्थिक बाब सुधारण्यासाठीं प्रयत्न.
१४ ग्रामोद्धार वर्ग--वडाळा मिशन
१५ डॉ. टेलरकृत नव्या करारांतील पुस्त-कांची प्रवेशिका
१६ डॉ. फेअरबँक व शेटीबा फकिरबा गायकवाड यांची भेट
१७ शुभ-वर्तमान आणि मंडळयासंबंधीं आस्था
१८ देडगांवीं उपासना मंदिराचें उद्घाटन
१९ डॉ. व मिसेस् फेअरबँक यांचें सेवा-निवृत्त होणें.

### भाग २ रा

### आठवणी

१ हंगामाचा दानधर्म
२ शांतिदूत आणि समान दृष्टि
३ राहुरी प्रांताची सेवा
४ बारीक सारीक गोष्टींत लक्ष व उदारमन
५ डॉ. व मिसेस् फेअरबँक यांचा पुरांतून बचाव
६ मला निराश केलें नाहीं.
७ काम करून शिक्षण
८ आदर्श ख्रिस्ती ग्रामांचा निर्माता
९ मामलेदाराची साक्ष
१० शुभ-वर्तमानाची आस्था
११ अपराधाची कबुली व शांति
१२ डॉ. व मिसेस् फेअरबँक यांचें फर्लो-वर जाणें.
१३ अ) पंडित होण्यास दिलेली गति
ब) शाळा व त्यांचा दर्जा
क) सर्व जातीशीं संबंध व सहकार्य
१४ फेअरबँक घराण्याचा आश्रय
शाळांची शिस्त
सरकारी इन्स्पेक्टरची शिफारस
ईश्वरी विद्येच्या वर्गांत प्रवेश
आचार्यपदाची दीक्षा
१५ ते वडाळयाचे साहेब आहेत

### भाग ३ रा

१ कविता
१) प्रेमगीत
२) कर्मवीर मिशनरी
३) फेअरबँक हा खरा मिशनरी
२ मिसेस् फेअरबँक यांचा मृत्यु स्मारक उपासना
३ डॉ. फेअरबँक साहेबांची तीन पत्रें चर्च मिशन एकीकरणाचे प्रसंग

### भाग ४ था

१ त्यावेळचे व आताचें मिशन-कामदार
२ कांहीं मिशनरींच्या कामाचा उल्लेख
३ आताचें वडाळा मिशन

# भाग १ ला

## जन्मस्थळ व काळ

डॉ. एडवर्ड फेअरबँक यांचा जन्म दक्षिण भारतांतील कोडीकनाल या ठिकाणीं ५ जून १८६७ सालीं सनिसाईड कॉटेजमध्ये झाला. अमेरिकन मराठी मिशनचे मिशनरी डॉ.व मिसेस् सॅम्युएल बी. फेअरबँक यांचे ते चिरंजीव होत. डॉ. एस् फेअरबँक हे सर्वांगीण सामर्थ्ययुक्त असे महात्मा होऊन गेले. त्यांस एकूण तेरा अपत्यें होती. पहिल्या पत्नी-पासून एक पुत्र व दोन कन्या आणि दुसऱ्या पत्नीपासून चार पुत्र व सहा कन्या त्यापैकीं दुसऱ्या पत्नीपासून झालेले सहावें अपत्य म्हणजेच आपले चरित्र नायक होत, एडवर्डची माता मिसेस मेरीबाई फेअरबँक ही अमेरिकन म. मिशनमधील सुप्रसिद्ध हेन्री बालं-टाईन नांवाच्या दुसऱ्या एका थोर व सुप्रसिद्ध मिशनरीची कन्या होय. डॉ. व मिसेस एस्. बी. फेअरबँक यांची नेमणूक पश्चिम भारतांतील अहमदनगर जिल्ह्यांतील मराठी मिशनच्या वडाळा प्रांतांतील वडाळा या ठिकाणीं झाली. मिसेस फेअरबँक आपल्या पतीच्या कार्यांत व आपल्या सभोंवती असलेल्या लोकांच्या जीवनाशीं एकजीव झाल्या होत्या. एडवर्ड आणि त्याला वडील असलेली बहीण ग्रेस ही दोघें हिंदी जीवनाशीं इतकें समरस झाले होते कीं, ते इंग्रजीपेक्षां मराठी भाषाच एखाद्या एतद्देशीय माणसाप्रमाणें सफाईदार बोलूं शकत होते.

## एडवर्डचें बालपण

एडवर्डच्या बालपणाच्या आठवणींचा संबंध त्यांच्या वडिलांनीं वडाळा प्रांतात खेडोपाडी केलेल्या फेरीशी येतो. तो काळ १० ऑक्टो. ते २० मार्च पर्यंतचा पावसाळा संपून खेड्यांतील रस्तें प्रवास करण्यास सुगम होऊन तंबूमध्यें राहण्यास जमीन सुकलेली असे. झाडाच्या छायेंत तंबू ठोकल्यामुळें उष्णतेचा त्रास कांहीएक वाटत नसे. ह्या ऋतूंत मिशनरीला खेड्यांतील लोकांना भेटण्यास अनुकूल समय होता आणि विशेषेंकरुन शुभ-वर्तमानासाठीं म्हणजे देवराज्याची सुवार्ता गाजविण्यास उत्तम वेळ होती.

एडवर्डला लहानपणीं बैलगाड्यांतून तंबू. बिछाने, मेज, भांडी वगैरे गरजेचें सामान नेणें व बैलगाड्यांतून प्रवास करणें ह्या गोष्टीं मौजेच्या वाटत असत. गांवोंगांवीं गाड्या घेऊन जाण्यास त्यांना बैल भाड्यानें घ्यावे लागत असत. ते बैल असें कीं, ते ओझ्याच्या गाड्या वेळेवर घेऊन जातीलच असें नाहीं. कारण हळूहळू चालणारे बैल वेळेवर गांवीं पोहोंचण्यास उशीर करीत असत त्यामुळें तंबू ठोकण्यास त्रास होई.

एडवर्डला रस्त्यांत केलेला उपदेश विशेष आवडत नसे. पण त्यांचे वडील डॉ एस्. बी. फेअरबँक हे जुन्या पद्धतीचें मॅजिक लॅंटर्न वापरुन चित्रें दाखवीत, तेव्हां पड्याभोंवती लोक समुदाय कसा जमून आतुरतेनें चित्रें पाहात बराच वेळ तटस्थ बसत असे याचे कौतुक वाटे. पहिल्या दोन तीन रांगांत मुलें-मुलीं बसत, नंतर पुरुषांच्या रांगा आणि त्याही अस्पृश्य लोकांच्या. त्यानंतर एका बाजूला गांवचें लोक आणि मग सर्व पुरुषांच्या मागे स्त्रिया बसत असत.

## जुन्या करारांतील देखावे (चित्रें)

जीं चित्रें दाखविण्यांत येत तीं विशेषेंकरुन प्राचीन कुलपती आब्राहम, याकोब, योसेफ, मोशे यांची असत. जुन्या करारांतील आणखी कांहीं चित्रें दाखविण्यांत येत असत. परंतु इतर गोष्टीपेक्षां एक विशेष नव्या करारांतील चित्र दाखविण्यांत येत असे. तें म्हणजे प्रभु येशुचें जगांत येणें होय आणि त्याचें सर्व मानव जातीच्या तारणाप्रीत्यर्थ वध स्तंभावर प्राण अर्पण करणें वगैरे चित्रें लोक आवडीनें आणि आतुरतेनें पाहात असत.

## डॉ. एस्. फेअरबँक यांचा संकटांतून बचाव

एकदां हिवाळयांत एडवर्डचे आई वडील अहमदनगरच्या ईशान्य बाजूला करंजीच्या घाटांतून तिसगांवापर्यंत फेरीला गेले. साहेबांनीं तांग्यासाठीं तट्टू बाळगिले होते. करंजीच्या घाटापर्यंत आल्यावर मडमसाहेब आणि एडवर्ड तांग्यातून उतरून चालूं लागले. ते बरेंच पुढें गेल्यावर त्यांनीं तांग्यांचा आवाज ऐकला तेव्हां त्यांनीं मागें वळून पाहिले तेव्हां तरणेबांड तट्टू घाटांतून भरधांव पळत होते. साहेब धोक्यांत आहेत असें मडमसाहेबांनीं तत्काळ ओळखिले तेव्हां घोडे थांबविण्याच्या उद्देशानें त्या रस्त्याच्या मधोमध उभ्या राहिल्या. साहेबांनीं हें ओळखून मडमसाहेबास मागें हटविण्यासाठीं ते म्हणाले, 'बाजूला व्हा, बाजूला व्हा." त्यांनीं लगेंच आज्ञा पाळली.

वडील साहेबांनीं घोड्याच्या काढण्या जोरानें आवरण्याचा प्रयत्न केला तरी घोडे तांगा घेऊन मडमसाहेब व एडवर्ड यांच्या जवळून गेले. हें पाहून मडमसाहेबांनीं ताबडतोब गुडघे टेकून साहेबांच्या संरक्षणार्थ देवाचा धावा केला. नंतर ती मायलेंकरें भीतभीत डोंगराला लहानसा वळसा घेऊन तांग्याच्या मागोमाग गेली. तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं, घोडे तांग्यासहीत स्तब्ध उभें आहेत पण चाकांत आणि सांठ्यांत अडकलेली आपली तंगडी बाहेर काढण्यासाठीं धडपड करीत आहेत. शेतांतील कामकरी हें दुःखद दृश्य पाहून साहेबांच्या मदतीसाठीं धावून आले. साहेबांस बाहेर काढल्यावर मडमसाहेब व एडवर्ड यांस असें आढळून आलें कीं, चाकाची धाव साहेबांच्या तंगडीला घांसून गेल्यामुळें तिचे स्नायु सोलून निघाले होते. ही भयंकर जखम भरुन येण्यास व पूर्ण बरी होण्यास कांहीं महिने लागले. हा अनुभव ते विसरण्यासारखें नव्हते. तरी देवानें त्यांच्या जीवाचें रक्षण केलें म्हणून त्यांनीं देवबापाची उपकारस्तुति केली.

## एडवर्डची खेळाडू वृत्ति

बालपणची खेळाडूवृत्ति ही एक नैसर्गिक गोष्ट होय. वडाळें हें एक खेड्यांतील खेडें, तरी खेळ व खेळगडी सर्वत्र असतातच. सुखसोईच्या बंगल्यांत नांदणारा एडवर्ड आंगणांत व पटांगणांत आल्यावर गोरगरिबांच्या लेंकरांत खेळ खेळतांना समरस होऊन जात असे व तें इतकें कीं, त्याला आपल्या सुख सोहळ्याचा विसर पडून जाई. कधींकधी त्याचे वडील डॉ. एस. बी. फेअरबँक बदलून नगरला जात. त्यावेळीं एडवर्ड शहर-

वासीय लेंकरांचे खेळ खेळण्यांत गुंग होऊन जात असे अशा प्रकारें एडवर्ड भारतीय खेळाशीं परिचितच नव्हे तर त्यांत तो पारंगत होत असे.

गोट्या, बँदुल, विटीदांडू, भोंवरा व भिंगरी, आंब्याच्या मोसमांत कोयांचे निरनिराळे खेळ, पतंग वावडी उडविणें वगैरे खेळांत एडवर्ड अगदीं तल्लीन होऊन जाई. नदी, ओढ्यांच्या पाण्यांतून पोहणें हा एक धाडसी खेळ समजतात. वडील खेड्यापाड्यांना भेटतांना त्यांना नदीनाले लागतच. त्यांत पोहण्याची एडवर्डला अनावर इच्छा होई. दम छाटून पाण्यांतून पोहणें ही एक कलाच समजतात. तिच्यांत आमचा छोटा एडवर्ड तरबेज झालेला होता. पुढें अमेरिकेला गेल्यावर तो एक निष्णात पोहणारा झाला. विलिस्टन विद्यालयांत असतांना त्यानें अर्ध्या मैलाच्या शर्यतीत भाग घेऊन ती जिंकली.

ही खेळाडूवृत्ति एडवर्ड अमेरिकन मराठी मिशनचा प्रतिष्ठित मिशनरी झाला. तरी ती कायमच होती. चांदण्या रात्रीमध्यें आपल्या कामगारांसह आट्यापाट्यांच्या खेळांत ते अगदीं रमून जात. मी अधिकारी आहे व हे माझे कामदार आहेत असें डॉ. फेअरबँकला कधींच वाटत नसे. खेळांतील गंमती चेष्टा, विनोद थट्टा पाहून व करून ते पोट भरून हांसत खिदळत असत. आट्यापाट्यांतील हुल-हेलकावे त्यांच्या अगदीं अंगवळणी पडलेले होते. मिशनांतील कोणत्याही प्रांतांत व अधिकारी-कामगार वर्गांतही खेळाडूवृत्ति दिसत नव्हती.

यामुळें साहेबांत व नोकर वर्गांत एक विलक्षण मोकळेपणा नांदत असे व हा कामकाजांतच नव्हे तर खाजगी जीवनांतील बाबींमध्यें आढळून येत होता नाजूक परिस्थितींतसुद्धां साहेब मजकूर सरळ व प्रेमळ सल्लामसलत देत असत. यामुळें बायका-लेंकरांमध्यें त्यांची लोकप्रियता दिसून येई.

## एडवर्डचें शिक्षण

भारतांतः- फेरीवर असतांना किंवा नगरांत राहतांना वडील साहेबांच्या मातोश्री आपल्या लेंकरांना चार अक्षरें शिकविण्यास वेळ काढीत असत. एडवर्ड आपली बहीण ग्रेस इजबरोबर १८७८ सालांत अमेरिकेला जाईपर्यंत त्यांना भारतांत जें शिक्षण मिळालें ते एवढेंच. त्यांना त्यांच्या मातोश्रीनें दुसऱ्या मार्गाचें शिक्षण दिलें तें म्हणजे तिनें त्यांस वाचावयास शिकविलें त्यांची आई दर रविवारी आपल्या ह्या दोन लेंकरांना तंबूंत घेऊन अगर झाडाखालीं बसून बायबलामधील दोन दोन वचनें असें क्रमाक्रमानें दोन तीन अध्याय त्यांच्याकडून वाचून घेत असे. या रीतीनें ती मुलें इंग्रजीमध्यें पवित्रशास्त्र वाचावयास शिकली. त्यामुळें त्यांस पवित्रशास्त्राचें ज्ञान झालें.

साहेबांच्या मातोश्री मिसेस एस. बी. फेअरबँक १८७८ सालच्या आरंभीं मरण पावल्या. त्यामुळें या कुटुंबाला फार मोठें दुःख झालें, तरी त्यांनीं ते प्रभुसेवेकरितां

गिळून घेतले. मिसेस एस बी. फेअरबँक यांनीं आपल्या मुलांच्या अंगीं विनय, सहनशीलता, धार्मिकता, औदार्य इत्यादि सद्गुण उत्पन्न करण्याच्या कामीं मोठें कार्य केलें.

अमेरिकेंतः- नंतर लवकरच एडवर्ड आणि त्यांची बहीण ग्रेस यांस त्यांच्या पुढील शिक्षणासाठीं अमेरिकेस जावें लागले. डॉ. क्लार्क यांच्या मित्राबरोबर ते नेपल्सपर्यंत गेले पण तेथून पुढें जहाजावरील कप्तानाच्या देखरेखीखालीं त्यांना आपला राहिलेला प्रवास संपवावा लागला. अबर्नडेल ( मॅसॅच्युसेटस् ) येथील मिसेस इ. एच. बॉकर यांच्या घरीं त्यांस ठेवण्यांत आलें. कॉलेजचें व ईश्वरी विद्येचें शिक्षण संपेपर्यंत एडवर्डला अमेरिकेंत राहावें लागले. कधीं अबर्नडेल येथील मिशनरी होममध्यें, तर कधीं नातलगांच्या घरीं राहून त्यानें आपलें शिक्षण पूर्ण केलें.

सुरवातीच्या काळांत आपलें शिक्षण पूर्ण होण्याच्या अगोदरच एडवर्ड अमेरिकेंतील जीवनाशीं इतका समरस होऊन गेला कीं, तो आपली मराठी भाषा पूर्णपणें विसरला.

एडवर्डनें अबर्नडेल (मॅसॅच्युसेटस) येथील ग्रामर स्कूलमध्यें जाऊन शिक्षण घेतले. ग्रामर स्कूल म्हणजे ज्या शाळेंत लॅटिन व ग्रीक भाषा शिकविल्या जातात ती शाळा. प्रथम त्यानें चवथ्या इयत्तेंत आरंभ करून तीन वर्षांच्या अखेर नवव्या इयत्तेचें सर्टिफिकेट ( प्रशस्तिपत्रक ) मिळविलें.

१८८१ सालीं सप्टेंबर महिन्यांत एडवर्डनें विलिस्टन सेमिनरींत ( जिला आतां विलिस्टन विद्यालय म्हणतात ) जाऊन शिकण्याचें ठरविलें. तेथें ४ वर्षें शिक्षण घेतलें. लॅटिन, ग्रीक, गणित, बिजगणित आणि इंग्रजी हे त्याचे विषय होते. एडवर्डनें तिसऱ्या वर्षीं वक्तृत्वस्पर्धेंत शंभर डॉलरचें बक्षिस मिळविले आणि खेळाच्या सामन्यांत अर्धा मैल पोहण्याची शर्यत जिंकली. विलिस्टनमधून पदवीदानाची सनद मिळाल्यावर त्याचा प्रवेश ॲम्हर्स्ट विद्यालयांत झाला. तेथें तो पहिल्या वर्गांतील विद्यार्थी म्हणून कॉलेजच्या अभ्यास संपेपर्यंत राहिला. तेथें त्यानें अंकगणिताचा अभ्यास ( त्रिकोणमिती, मूळ तत्वज्ञानासंबधीं भूमिती ) चालू ठेवला. वनस्पतिविद्या, प्राण्यांचें जीवनशास्त्र, रसायनशास्त्र, प्रश्न ज्योतिषशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. वरच्या वर्गांत असतांना त्यावर्षी मानसशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास आणि इंग्रजी वाङमय यावर जोर देण्यांत आला होता. चार वर्षांच्या अखेर त्याला मिळालेली बी. ए. ची पदवी मानसन्मान व गौरवपर अशी गणण्यांत आली. ह्याच कॉलेजनें पुढें १९२९ सालीं त्याला डी. डी. ( डॉक्टर ऑफ डिव्हिनाटी ) ची पदवी बहाल केला.

ॲम्हर्स्ट कॉलेजांतून ते येल डिव्हिनिटी कॉलेजमध्यें जाऊन ईश्वरी विद्याभ्यास करूं लागले. दोन वर्षांनंतर ईश्वरीविद्येच्या उच्च शिक्षणासाठीं त्यांना अँडोव्हर ईश्वरीविद्येच्या पाठशाळेंत पाठविण्यात आले. अर्थातच पाठशाळेंतील अभ्यासक्रमांत या तीन वर्षांत पवित्रशास्त्राभ्यासाला केंद्रस्थान देण्यांत आले होते. याचा अर्थ हा कीं, पवित्रशास्त्रांतील प्रत्येक पुस्तकाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्यांत येई, शिवाय पवित्र-

शास्त्रावर आधारलेली पद्धतशीर ईश्वरीविद्या, मंडळीचा इतिहास, इब्री भाषा, लिखाणानें आणि भाषणानें उपदेशाची तयारी करण्यांत येत असे.

ख्रिस्ताची शिकवण आणि सबंध ख्रिस्त चरित्र यावर विशेष जोर देण्यात येत असे. पाठशाळेंतील पदवीदानापूर्वी ईश्वरीविद्येच्या विद्यार्थ्याला एक प्रबंध लिहावा लागे. त्यांत त्यानें ज्या महत्वाच्या विषयाचा किंवा चरित्राचा अभ्यास केलेला असेल त्याचें दिग्दर्शन करावें लागे. मग त्या प्रबंधाचें मोल त्यांच्या कॉलेजच्या शिक्षण पाहणाऱ्या मंडळीसमोर ठरविलें जाई. जर ईश्वरीविद्येच्या विद्यार्थ्याचा कॉलेजमधील अभ्यास आणि प्रबंध पूर्णपणें पसंत पडला ( चांगल्या दर्जाचा वाटला ) तर त्याला ईश्वरी विद्येच्या वर्गांतील अभ्यास पूर्ण ( मनाजोगा ) केल्याचें प्रशस्तीपत्रक मिळे. आणि कॉलेज त्याला एम्. ए ची पदवी देई. ही एम्. ए. ची पदवी त्यानें मिळविली.

१८९१ सालीं उन्हाळ्याच्या सुटींत व्हरमौंट येथील चर्चच्या उपासनेची जबाबदारी एडवर्डवर सोपविली होती. मग अँडोव्हर ईश्वरी विद्येच्या पाठशाळेंतील पदवीदान समारंभानंतर एडवर्डला कनेक्टिकट परगण्यांतील रॉक्सबेरी येथील प्रॉटेस्टंट मंडळीचे आचार्य म्हणून काम करण्यास बोलावण्यांत आले. त्यानें त्या मंडळीची सेवा जून १८९२ ते १८९३ पर्यंत वर्षभर केली. पुढील हकीकत सांगण्यापूर्वी एक गोष्ट नमूद करणें महत्वाचें आहे. ॲम्हर्स्ट कॉलिजमध्यें एडवर्ड शिकत असतांना १८८६ त नॉर्थफिल्ड येथें उन्हाळ्यांत भरलेल्या कॉन्फरन्समध्यें मिशनरी कामासाठीं ज्या शंभर विद्यार्थ्यांनीं स्वत:ला वाहून घेतले होते त्यांत एडवर्ड हा एक होता. सबंध अमेरिकेंत जी परदेशीय मिशनरी कामासंबंधीची तरुणांची स्वयंस्फूर्तीची चळवळ सुरू झाली तींत हजारों विद्यार्थ्यांना सामील करून घेण्यांत आले होते. म्हणून जागतिक मिशनरी कामासंबंधीची एक नवीन चेतना मंडळ्यांना देण्यांत आली.

ॲम्हर्स्टमध्यें असतांना एडवर्ड सर्वांचा इतका आवडता झाला आणि त्याला इतका मान मिळूं लागला कीं, १८९२ मध्यें त्यानें अँडोव्हर येथील आपलें ईश्वरी विद्येचें शिक्षण संपविलें आणि रॉक्सबेरी येथें ॲक्टिंग पाळक म्हणून अमोल अनुभवाचें वर्ष काढलें.

१८९३ सालच्या वसंत ऋतूंत ॲम्हर्स्ट कॉलेजच्या उपासना मंदिरांत चर्च कौन्सिलची सभा भरली होती. त्यावेळीं कौन्सिलनें एडवर्डची परीक्षा घेतली तेव्हां कॉलेजमधील अभ्यास, कार्यकारी आचार्य म्हणून केलेली सेवा आणि ख्रिस्तीशील या गोष्टींचा विचार करून ख्रिस्ती सेवेसाठीं त्याला आचार्यपदाची दीक्षा दिली. एडवर्डनें जी शिफारस पत्रें कौन्सिलला सादर केली होती त्यांत ॲम्हर्स्ट कॉलेजनें त्यास चर्चचा पूर्ण कार्यकारी सभासद म्हणून प्रतिपादिलें होते; एवढेंच नव्हे तर त्या कॉलेजच्या मंडळानें आपल्यातर्फे त्याला भारतांत आपला मिशनरी प्रतिनिधी म्हणून पाठविण्यासाठीं निवड केली. आणि उदरनिर्वाहासाठीं लागणाऱ्या पैशांचा कांहीं भाग त्यांनीं उभा केला.

## त्यांचें लग्न व भारतांत आगमन

१४ जून १८९३ सालीं न्यू जर्सी येथील मॉरिसटाऊनमधील मेरी ॲडेलेड एस्कीच्या-बरोबर तिच्याघरीं एडवर्डचें लग्न झालें. त्याचवेळीं त्यांची नेमणूक अमेरिकेंतील बोर्डानें भारतांतील मिशनरी म्हणून केली. ते उभयतां २९ जुलै १८९३ सालीं न्यूयॉर्कमधून भारताला यावयास आगबोटीनें निघाले. यूरोपमधून प्रवास करून १७ सप्टेंबर १८९३ रोजीं ते मुंबईस पोहोंचले. त्यावेळीं त्यांच्या वडिलांनीं, इतर परदेशीय मिशनरींनीं व हिंदी ख्रिस्ती पुढाऱ्यांनीं त्यांचें स्वागत केले.

एडवर्ड आणि मेरी या दाम्पत्याला मराठी भाषेचें ज्ञान नव्हतें. साहेब तर बाल-पणीं अवगत केलेली मराठी भाषा पूर्णपणें विसरून गेले होते म्हणून त्यांनीं पंडितांच्या साहाय्यानें मराठी भाषा शिकण्यास आरंभ केला. त्यांचीं एकंदर पहिलीं पांच वर्षें मराठी भाषेचा पूर्ण आणि चांगला अभ्यास करण्यांत गेलीं. मुंबईंत तीन महिनें घालविल्यावर मिशनचें मध्यवर्ती केंद्र अहमदनगर येथें त्यांस पाठविण्यांत आले. तेथें ते वर्षभर राहिले. पारनेर प्रांताची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली होती.

मे १८९५ सालीं महाबळेश्वर मुक्कामीं भरलेल्या बैठकींत सोलापुरांतील काम करण्यासाठीं त्यांची नेमणूक झाली. ते सोलापुरांत ५ वर्षें राहिले. त्या अवधींत मुलां-साठीं असलेल्या मराठी इंग्रजी शाळेचें काम ते पाहूं लागले आणि पश्चिम भागांतील खेड्यांच्या शाळा आणि तीन मंडळ्या यावर देखरेख करूं लागले.

१८९८ सालीं एडवर्ड फेअरबँक यांची बदली वडाळ्यास झाली. याच ठिकाणीं त्यांचें बालपण सुखांत गेले होते. योगायोग किती विचित्र ! याच ठिकाणीं छोटा एडवर्ड वडाळ्याच्या मातींत लोळला, खेळला होता. तेथेंच तो अधिकारी म्हणून आला !

## वडाळ्याचा अल्प परिचय

वडाळा हें लहानसें खेडें असून अहमदनगरापासून २७ मैलांवर आहे. ८०० चौरस मैलांच्या टापूंत असलेल्या १५० लहानमोठ्या खेडेगांवांच्या मध्यभागीं वडाळा आहे. ह्या टापूंतील लोकसंख्या एक लाखावर आहे. १८५७ मध्यें डॉ. सॅम्युएल फेअरबँक यांनीं अहमदनगरहून येऊन हें नवीन ठिकाण उघडलें. हें मिशन केंद्र ( ठाणें ) उघडण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला. एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्याला एक महत्वाचें स्थान प्राप्त करून दिले. त्यांनीं शाळा उघडल्या, मंदिरें बांधण्यासाठीं, शेती सुधारण्यासाठीं व ख्रिस्ती लोकांची वाढ होण्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न केले.

त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव रे. हेन्री फेअरबँक आणि त्यांच्या कुटुंबांनीं १८८७ पासून तों १८९८ पर्यंत असें एकूण ११ वर्षें वडाळा प्रांताचें काम केलें. त्यांनींही वडिलासार-खीच वृत्ति धारण करून काम केले. त्यांच्या पत्नीची प्रकृति बिघडली म्हणून त्यांचें अमेरिकेस जावें लागले. त्यानंतर रे. एडवर्ड फेअरबँक हे वडाळा आणि वडाळा प्रांतास

काम पाहूं लागले. वडाळा प्रांत हा मोठा प्रांत होय. त्यावेळीं वडाळे प्रांतात ९६५ सभासद असलेल्या ९ मंडळ्या आणि १५ शाळा होत्या. समाजांत प्रेमाचें, सहकार्याचें आणि शांततेचें वातावरण होते.

अशा परिस्थितींत एडवर्डनें ह्या वरील कामासाठीं आपणाला वाहून घेतलें. कारण भारतांतील उष्ण हवा सहन करण्याची शक्ति, जिव्हाळ्याची मैत्री, सबंध प्रांतांत ख्रिस्त संदेश पोहोंचावा अशी शुभवर्तमान प्रसाराची कळकळ ह्या गोष्टी रे. फेअरबँक साहेबामध्यें होत्या. त्यांच्या नेतृत्वाखालीं वडाळा हे पश्चिम भारतांतील अत्यंत महत्त्वाचें असें खेड्यापाड्यांतील सेवेचें ठिकाण बनलें व त्या क्षेत्रांत त्यांचें फारच वजन वाढलें.

आपला बाप व भाऊ यांच्यासारखेच रे. ए. फेअरबँक साहेब आपल्या भारतीय जीवनाशीं समरस झाले. अत्यंत परिश्रम करून त्यांनीं साधी, सोपी आणि परिणाम-कारक मराठी भाषा बोलण्यांत प्रभुत्व मिळविलें. भाषेचें ज्ञान आणि त्यासोबतच जिव्हाळ्याची मैत्री व मनाचा सरळपणा या गुणामुळें ग्रामीण जीवन आणि विचार यांचें सूक्ष्म ज्ञान होण्याचा मार्ग खुला झाला.

रे. डॉ. ए. फेअरबँकसाहेबांनीं दुष्काळांत आणि त्यानंतर चर्च, एक नवीन बंगला, रुग्णालय आणि लहानमोठीं घरें बांधिली. वडाळा चर्चमध्यें १३०० लोक बसूं शकतात. त्याच्या भिंती दुष्काळीं काम म्हणून बांधण्यांत आल्या. कौलारू छतासाठीं अमेरिकेंतील एका मित्राकडून मदत मिळाली. कित्येक मैलावरून ह्या चर्चचा मनोरा दिसतो. ज्यांना ही खूण दिसते त्यांना वडाळ्याची उपयुक्तता वाटते.

साहेबांनीं पितृनिष्ठ प्रेमानें प्रेरित होऊन वडाळ्यांत आपल्या वडिलांची दोन स्मारकें केली आहेत. कंपौंडांत एक विहीर बांधून तिला "शमुवेल विहीर" हें नांव दिलें आहे आणि दुसरें वडाळ्याच्या पूर्वेस थोड्या अंतरावर कांहीं शेतें खरेदी करून त्यांत कांहीं घरें व विहीर बांधून त्या ठिकाणाला "गोरापूर" हें नांव दिलें आहे. 'फेअरबँक' याचा अर्थ "गोरापोर" असा आहे. कोडीकनालमध्यें त्यांच्या वडिलांनीं बांधलेल्या बंगल्याचेंही हेंच नांव आहे.

## नवीन मिशनरींचा मार्गदर्शक

कामापुरतें मराठीचें ज्ञान देण्याच्या पहिली व दुसरी अशा दोन परीक्षा असत. त्यांतून थोडेसें पुस्तकी ज्ञान व कांहीं व्याकरण नियामक ज्ञान मिळत असे. परंतु त्यावरून मिशनरीला मराठी व्यवहार क्वचितच लाभे. आतांशीं ख्रिस्ती समाजांत शहराशहरांतून चांगले शिकलेले हिंदी लोक दृष्टोत्पत्तीस येतात. एवढेंच नव्हे तर बहुतेक खेड्यांतूनही थोडेबहुत शिकलेली मंडळी सांपडतात. तेव्हां अशा लोकांत तुटपुंजी मराठी जाणणारा मिशनरी पुढारी म्हणून साजत नसे. म्हणून अमेरिकन मराठी मिशननें एक दूर दृष्टीचें धोरण आंखलें. मराठी बोलींत तरबेज आणि मिशनरीकार्यांत अनुभविक अशा मिशनरीच्या समागमांत नव्या मिशनरींनीं कार्यारंभापूर्वीं कांहीं दिवस तरी घालवावे असें धोरण जन-

रल कौन्सिलनें ठरविलें. या कामीं वडाळयाचे फेअरबँक हे आदर्श मार्गदर्शक होत असें कौन्सिलला वाटत होतें. म्हणून मराठी दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांना वडाळयांत ठेवण्यांत येई. रे. ए. एच. क्लार्क, रे. फेल्ट, रे. लॉंग, रे. स्वार्ट वगैरे मिशनरींना वडाळयांतील समागम व मार्गदर्शन हीं फार उपयुक्त होऊन गेली. परिक्षेच्या शिक्षणाहून हें व्यावहारिक मार्गदर्शन फार उत्तेजनदायी होई.

## निष्णात भाषा-पंडित

मराठीच्या दोन्ही परिक्षांचे परीक्षक म्हणून डॉ. फेअरबँक परीक्षक मंडळाला भेटत. त्यांच्यांत डॉ. फेअरबँकनें एक नवीन स्फूर्ति निर्माण केली. वेगवेगळया मराठी क्षेत्रांतील वेगवेगळे मिशनरी वैयक्तिकरित्या उपलब्ध अशा ब्राह्मण पंडितांकडून शिकत असत. त्यामुळें प्रत्येक पंडित आपापल्या पद्धतीनें व आपापल्या समजुतीनें शिकवीत असे व परीक्षक मंडळीला सारख्या धोरणानें परीक्षा घेणें अवघड वाटे. म्हणून एक मिशनेरी भाषा-शाळा ( Language school ) निर्माण करण्यांत आली. उन्हाळयाच्या मार्च, एप्रिल व मे महिन्यांत ती महाबळेश्वर या थंड ठिकाणीं भरविण्यांत येई. पहिल्या परिक्षेचा एक व दुसरीचा एक असे दोन वर्ग भरविण्यांत येत असत. महाराष्ट्रांतील निरनिराळी मिशनें आपापल्या नव्या मिशनेरी स्त्री-पुरुषांना आपल्या खर्चानें महाबळेश्वरी पाठवीत. यांची संख्या ४० ते ८० पर्यंत असे. असा ह्या भाषा-शाळेचा लौकिक सर्व महाराष्ट्रीय ख्रिस्ती मिशनांत झाला व तो डॉ. एडवर्ड फेअरबँकच्या स्फूर्तीनें निर्माण झाला यांत शंका नाहीं.

पहिला वर्ग सोपा व दुसरा अवघड अशी सर्वसाधारण शिक्षण-खात्याची समजूत. परंतु आमच्या मिशनेरी भाषा शाळेंत तें अगदींच उलटे असे. पहिल्या वर्गाचे शिक्षक डॉ. एडवर्ड फेअरबँक व दुसऱ्याचे एक नामांकित युनिव्हर्सिटीचे पदवीधर ब्राह्मण पंडित असत. परंतु दुसऱ्यापेक्षां आमच्या फेअरबँकसाहेबांच्याच पहिल्या वर्गांत अधिक गर्दी व अधिक ज्ञान मिळत असे.

एका वर्षी एक दुर्दैव उभें राहिलें. शाळेंतील वर्ग चालू असतां डॉक्टर फेअरबँकसाहेबाला काळपुळी उठल्यामुळें एकदम अमेरिकेला जाणें भाग पडलें. त्यावेळीं शाळेचे सुपरिंटेंडेंट पुण्याचे सुप्रसिद्ध व विद्वान मिशनेरी डॉ. एन. मकनिकल होते. फेअरबँकसाहेबांचा हा अचानक वियोग हा फारच मोठा पेंच होता. डॉ. फेअरबँकनें कांहीं न डगमगता मकनिकलसाहेबांस स्पष्ट असा सल्ला दिला कीं जर शांतवनराव साळवीला नेमलें तर सर्व कांहीं सुरळीत होईल. त्याप्रमाणें साळवीला वर्ग घेण्यास पाचारण केलें व फेअरबँकसाहेबाची जागा त्यांनीं फार यशस्वीरीतीनें भरून काढिली. त्या यशाचें संपूर्ण श्रेय साळवी केवळ डॉ. फेअरबँकलाच देतात. कारण त्याच्याच उत्तेजनानें साळवी एक सुप्रसिद्ध पंडित बनला. डॉ. मकनिकलही खुष झाले.

अमेरिकेहून आल्यावर डॉ. फेअरबँक यांनीं "A start in Marathi" ही पुस्तिका मिशनेरीसाठीं लिहिली. तिच्यांत साळवीची मदत मिळाल्याचें साहेब मजकुरांनीं

प्रस्तावनेंत लिहिलें आहे. ही भाषा शाळा आजवर चालूं आहे.

## सभेटाचें कार्य

सर्व जातीचे व सर्व ठिकाणचे लोक आपापली भांडणें मिटविण्यासाठीं त्यांची मदत घेऊं लागले. आपल्या भारतांतील लोक भांडणें मिटविण्यासाठीं बहुत करून कोर्टांत जातात. म्हणून त्यांचें फार नुकसान होते. लोक त्यांना वडील फेअरबँक म्हणून संबोधू लागले. वडीलसाहेब प्रत्येक भांडणाचा निकाल अत्यंत दक्षतेनें लावीत व जो सल्ला ते देत तो सर्वांना मान्य होई.

डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे ते माननीय सभासद होते. दुष्काळाच्या दिवसांत शाळा, रस्ते, आरोग्य व मदत (पैशांचें सहाय्य) या विषयींचे प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ मदत केली. १९०५ मध्यें जो मोठा दुष्काळ पडला त्यावेळीं शेंकडों मुलांचे व प्रौढांचे प्राण त्यांनीं वाचविले.

## शैक्षणिक सेवा

मिशनरींच्या अभावी अहमदनगर येथें असलेल्या नॉर्मलस्कूलवर साहेबांची तात्पुरती नेमणूक एका वर्षासाठीं केली. दुसऱ्या वेळेस त्यांना एका वर्षासाठीं अहमदनगर मिशन हायस्कूलवर नेमण्यांत आले. आणखी एका वेळेस एका वर्षासाठीं त्यांना मुंबईतील ह्यूम मेमीरियल हायस्कूलवर नेमिले. तरीसुद्धां ते वडाळा प्रांताचें काम पहात होते.

डॉ. फेअरबँकसाहेबांनीं वडाळा व वडाळा प्रांतांतील शाळेच्या शिक्षकांकडे विशेष लक्ष लाविलें. जोरदार पाहाणी करून आणि शिक्षकांबरोबर कामांत गढून जाऊन त्यांनीं त्यांत सुधारणा करून शाळांची संख्या ४२ पर्यंत नेली आणि ग्रँट दोन हजार (२०००) रुपयांनीं वाढली असे शाळेचे सुपरवायझर रेव्ह. र. मो. ओणावळे यांनीं ग्रामोद्धार वर्गाच्या वेळीं सांगितलें. विशेष होतकरू विद्यार्थ्यांस अहमदनगर येथील ट्रेनिंग स्कूल आणि हाय-स्कूलमध्यें जाऊन शिक्षण घेण्यास उत्तेजन दिलें.

ही योजना इतक्या उत्तम प्रकारें चालली कीं, त्यांच्या सेवेच्या काळांत सर्वांत यशस्वी शाळांनीं सुमारें ३०० तरुण लोकांना बाहेर पाठविले आणि ते पश्चिम भारतांतील मिशनामध्यें आणि मंडळ्यांमध्यें ख्रिस्ती कामगार बनले.

वडाळ्यांतील त्या मुलांपैकीं श्री. भास्कर पांडुरंग हिवाळे या नांवाचा मुलगा डॉ. इ. फेअरबँकसाहेबांच्या मदतीनें अमेरिकेस उच्च शिक्षणाकरितां गेला. तेथें त्यांनीं हार्वर्ड युनिव्हर्सिटीची पी. एच. डी. ची पदवी मिळविली आणि मुंबईतील विल्सन कॉलेजमध्यें ते तत्वज्ञान विभागाचे मुख्य झाले. ह्या वेळेपासून रे. डॉ. भा. पां. हिवाळे प्रसिद्ध आणि यशस्वी असे अहमदनगर कॉलेज स्थापण्यास पुढें सरसावले. ते भारतांतील ख्रिस्ती पुढा-ऱ्यांपैकीं एक प्रमुख व्यक्ति म्हणून गणले गेले.

## लोकांची आर्थिक बाब सुधारण्यासाठीं प्रयत्न

डॉ. फेअरबँकसाहेब खेड्यांतील ख्रिस्ती लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा मार्ग शोधूं लागले. बहुतेक ख्रिस्ती लोकांना स्वतःचा असा जमीनजुमला कांहींच नव्हता. साहेबांनीं त्यांस जमीन मिळवून देण्यास मदत केली आणि मिशनाच्या शेतीस उत्तेजन दिलें आणि उत्तम प्रकारचे बीं-बियाणें वापरण्यास आणि जातवान जनावरें ठेवण्यास सांगितलें.

वडीलसाहेबांनीं मिशनाच्या रिपोर्टांत असें लिहून ठेवलें आहे कीं, आमचे लोक गरीब आहेत. पन्नास वर्षांपूर्वी क्वचितच एकाद्या मनुष्याला स्वतःचें शेत असे. तथापि आज वडाळा प्रांताच्या ५ हजार ख्रिस्ती लोकांपैकी चारशें लोकांना शेती आहे आणि ती १० ते १५० एकर आहे. पुष्कळ लोकांच्या ठायीं स्वतःचें पोट भरतांना किंवा पोषण करतांना स्वाभिमान जागृति झाली आहे आणि गुलामगिरींतून किंवा दास्यत्वांतून सुटण्यासाठीं स्वतंत्रता निर्माण झाली आहे.

## ग्रामोद्धार वर्ग वडाळा-मिशन

खेड्यापाड्यांची उन्नति करण्याकडे रे. डॉ. इ. फेअरबँक व रे. आर. डब्ल्यू. फेअरबँक यांचें फार लक्ष होतें. त्यांनीं हा वर्ग मुद्दाम भरविला. मुंबई इलाख्यांतील २० मुख्य भागांतून १०९ विद्यार्थी वर्गास आले होते आणि आसपासच्या खेड्यापाड्यांतून ९०० च्यावर मंडळी त्या प्रसंगास जमली होती. बड्याबड्या मंडळीस आमंत्रण केलें होतें. डॉ. डब्ल्यू. बर्न्स, डी. एस्सी., शेतकी खात्याचें डायरेक्टर, गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, रे. डॉ. भा. पां. हिवाळे, रे. डब्ल्यू. विल्की ब्राऊन, एम्. ए., इंग्लंडमधील इंडियन व्हिलेज वेलफेअर असोशिएनच्या सेक्रेटरी मिस केंटन, मे. दि. सु. मोडक, एम्. ए. एल्‌एल्. बी., बी. एस्सी., रावसाहेब गाडगीळ, असिस्टंट डेप्युटी डायरेक्टर आणि रावसाहेब पंडीत यांचीं शेतकी खातें, मानसिक आरोग्य, सहकारीत्व, क्षेत्रपद्धति या विषयांवर भाषणें झालीं. जमलेल्या मंडळीस फार लाभ झाला.

## डॉ. टेलर कृत नव्या करारांतील पुस्तकांची प्रवेशिका

या पुस्तकावर डॉ. इ. फेअरबँकसाहेबांनीं फार चांगली टिका लिहिली आहे.

प्रस्तुत पुस्तक विद्वान् गृहस्थांनीं हिंदी लोकांमध्यें पुष्कळ वर्षें राहून हिंदी ख्रिस्ती लोकांची मोठी गरज लक्षांत आणून लिहिलें आहे व ही गरज त्यांनीं यथायोग्यरीतीनें भागविली आहे म्हणून आनंद वाटतो. पण ह्या पुस्तकाचें मोल गुजराथी भाषा जाणणाऱ्याकडून कळून आल्यावर त्याचें भाषांतर मराठी भाषेच्या लोकांकरितांही झालेलें आहे. यावरून तर अधिकच आनंद वाटतो. आपल्या नव्या कराराचा लोक जितका अभ्यास करतील तितका थोडाच. या सर्व अभ्यासांत ह्या प्रवेशिकेचा उपयोग केल्यानें आपल्यासाठीं व जगासाठीं प्रकट केलेल्या जीवनदायी विचारांचा लाभ उत्तरोत्तर जास्त होईल अशी

लेखकास आशा आहे. यावरून त्यांची अध्ययनवृत्ति व सखोल अभ्यास याची जाणीव झाल्याविना राहवत नाही.

इ. फेअरबँक

वडाळा–मिशन
४–८–१९२५

## डॉ. इ. फेअरबँक व शेटीबा फकिरबा गायकवाड यांची भेट

१८७२ ते १८७७ पर्यंत अहमदनगरमधील कोटांत डॉ. एस. फेअरबँक व मडम–साहेब आपल्या मुलांसह राहिले. पुढें हें ठिकाण मिशन हायस्कूलसाठीं देण्यांत आलें. कांहीं दिवस एडवर्डच्या वडिलांना मिशनाचें कामकाज नगरास राहून करावें लागत असे आणि त्यांच्या मातोश्री मि. हेगच्या नांवाखालीं चाललेलें मुलांचें नॉर्मलस्कूल याची देख–रेख करूं लागल्या. याचठिकाणीं मुलांच्या शाळेचे शिक्षक शेटीबा फकिरबा गायकवाड यांची मुलाखत झाली. डॉ. इ. फेअरबँकसाहेब म्हणतात, "शेटीबा मला माणसांत माणूस आढळला. तो उत्तम शिक्षक होता. शेटीबा सर्वांचें खरे मित्र होते. शाळा शिक्षकाचे ते शाळा इन्स्पेक्टर झाले. पुढें त्यांची निवड ईश्वरी विद्येच्या वर्गासाठीं झाली. शिक्षण संपल्यावर ते वडाळा मंडळीचे पहिले पाळक झाले.

एका वर्षासाठीं वडीलसाहेब अमेरिकेस फर्लोवर गेले तेव्हां रे. शेटीबा गायकवाड यांस वडाळा प्रांताची देखरेख करण्यासाठीं ( सुपरिटेंडेन्ट ) नेमिले.

वडीलसाहेब पंधरा महिन्यानंतर रजेहून आले तेव्हां पूर्ववत् काम करण्यापूर्वी शेटीबाविषयीं येणेंप्रमाणें आढळून आलें. (१) रे. शेटीबा गायकवाड यांनीं कुशलतापूर्वक देखरेख केली. त्यांनीं तें काम वेगवेगळ्या व्यापकदृष्टीनें आणि जोरदारपणें पुढें चालविलें. (२) त्यांच्याकडे ठेवलेल्या पैशांचा विनियोग त्यांनीं योग्यप्रकारें केला. (३) मिशनचे कामांत त्यांचें फार साह्य झाले.

## शुभवर्तमान आणि मंडळ्यासंबंधीं आस्था

रे. डॉ. इ. फेअरबँकसाहेबांच्या कामाचा जिव्हाळा मंडळ्यांची काळजी आणि ख्रिस्ती शुभवर्तमान प्रसार करणें. साहेब प्रथम दुचाकी गाडीवर किंवा घोड्याच्या दुचाकी टांग्यानें, नंतर मोटारनें सबंध प्रांत फिरत असत. ते आपला साधा आणि अचूक संदेश मंडळ्यांना किंवा खेड्यापाड्यांतील सर्व श्रोतृसमुदायाला सांगत असत. ते आपल्या काम–काजासाठीं रिफ्रेशर कोर्सेस ( उजळणीचे वर्ग ) भरवित असत. त्यांनीं व मडमसाहेबांनीं लोकांवर प्रेम करून आणि त्यांचा विश्वास संपादून सेवा केली.

## देडगांवीं उपासना मंदिराचें उद्घाटन

देडगांवीं ख्रिस्ती मंडळीनें उपासना मंदिर बांधिलें. ते स्वर्गवासी डॉ. गोविंदराव हिवाळे, डॉ. बी. पी. हिवाळे आणि गांवकरी ख्रिस्ती मंडळीनें डॉ. फेअरबँकसाहेबांच्या सम्मतीनें आणि मदतीनें बांधिलें आहे. आचार्य रे. भा. मि. कसोटे हे तेथें कांहीं दिवस काम करीत असतांना प्रस्तुत लेखकाला कळविलें कीं, मंदिर बांधण्यासाठीं प्रथम डॉ. गोविंदराव हिवाळे यांनीं १००१ रुपयांची रक्कम आगाऊ दिली आणि तें बांधून पूर्ण होईपर्यंत देखरेख केली.

फेअरबँक मडमसाहेबांच्या हस्तें मंदिराचा उद्घाटन प्रसंग चांगला झाला. वडील-साहेब आणि मडमसाहेब लवकरच सेवानिवृत्त होणार होते म्हणून प्रांतांतील मिशन कामदार, खेड्यापाड्यांतील बंधुभगिनी आणि पाहुणें मंडळी उपस्थित झाली होती. ह्यावेळीं देडगांव मंडळीनें आणि प्रांतांतील लोकांनीं साहेबांना व मडमसाहेबांना फुलांचे हार घातले. ते दोन टोपल्यांनीं गच्च भरून गेले. त्यांच्यावर लोकांचें एवढें प्रेम होते !

त्याचप्रसंगीं प्रस्तुत लेखकानें डॉ. फेअरबँकसाहेबांना **"उपासना"** हें पुस्तक समर्पण केलें. तें त्यांना इतकें आवडले कीं, मला त्यांनीं आपल्या मोटारींत वडाळ्यास आणिलें आणि साहेब व मडमसाहेब यांनीं आपल्या बरोबर जेवावयास बसविले आणि अमेरिकेला जाण्यापूर्वीं त्यांनीं मला आपली कांहीं उपयुक्त आणि मौल्यवान् पुस्तकें बक्षिस दिली. त्यांचे या प्रेमळपणानें मला धन्यता वाटली.

## डॉ. व मिसेस फेअरबँक यांचें सेवानिवृत्त होणें

वडीलसाहेब आणि मडमसाहेब १९३७ सालच्या मध्यंतरी भारतांतून अमेरिकेस गेले. १९३७ सालापासून १९३८ अखेर त्यांचें रजेचें ( फर्लो ) वर्ष होते तरी ते मिशनाचे सभासद होते. म्हणून मष्टें. १९३७ पासून १९३८ ऑगस्टपर्यंत त्यांची एकंदर सेवा ४५ वर्षांची झाली.

आपल्या नातवांच्या शिक्षणासाठीं नॉर्थफिल्ड मॅसॅच्युसेटस् हें ठिकाण त्यांच्या वसतिसाठीं उत्तम होते. नॉर्थफिल्ड मुलींची शाळा आणि मौंटहर्मन मुलांची शाळा केवळ चार मैल दूर असून तीं ठिकाणें त्यांच्या शिक्षणासाठीं चांगली होती आणि नॉर्थ-फिल्डपासून केवळ २५ मैल दूर असलेलें मौंटहोलियोक कॉलेज वयस्कर ( वडील ) नात ॲलिस इच्यासाठीं उपयुक्त आणि लाभदायक असें उत्कृष्ट ठिकाण होते. मिशनरीसाठीं बांधलेल्या घरांत त्यांनीं कांहीं वर्षें भाड्यानें वसति केली. पण तेथून निघावे लागल्यामुळें त्यांनीं स्वतःचें घर बांधिलें. त्याचा त्यांनीं ५ वर्षें उपभोग घेतला. त्यांनीं मॅसॅच्युसेट्स येथें नॉर्थफिल्डमध्यें जें घर बांधिलें तें त्यांची मुलगी जी भारतांत सेवा करून मरण पावली ती ॲडेलेड राईटबाई इच्या चार मुलांसाठीं होते. तें त्यांच्यासाठीं आणि नॉर्थफिल्डमधील सबंध समाजासाठीं अमोल असें होते.

डॉ. व मिसेस फेअरबँक हे १९३७ सालीं भारतांतून सेवानिवृत्त झाले तेव्हां आपला मुलगा रॉबर्ट व त्याचें कुटुंब सोलापुरांत परिणामकारक असें मिशनरी काम करीत आहेत हें पाहून त्यांस आनंद झाला.

१९३७ ते १९४९ पर्यंत नॉर्थफिल्ड येथें असतांना आम्ही आसपासच्या खेड्या-पाड्यांतील मंडळ्यांना जी कांहीं गरज लागेल ती पुरवीत होतो. १९४९ सालीं आक्टोबर अखेर आम्ही अबर्नडेल मास येथें राहावयास गेलो. मडमसाहेबाच्या मृत्यूनंतर मी बार्टन हाऊसमध्यें राहूं लागलो. असें डॉ. फेअरबँकसाहेब सांगतात.

५ जून १९६२ रोजीं डॉ. फेअरबँकसाहेबांचा ९५ वा वाढदिवस साजरा झाला. रे. जे. एल. मोल्टनसाहेब हे त्यांना नुकतेंच अमेरिकेंत भेटून आले. डॉ. फेअरबँकसाहेबांनीं त्यांचेबरोबर भारतांतील ख्रिस्त मंडळ्यांना संदेश दिला आहे कीं, **"तुम्ही ख्रिस्तांत रहा."**

# भाग २ रा.

# रे. डॉ. इ. फेअरबँक यांच्या आठवणी

## हंगामाचा दानधर्म

श्री. ए. साळवे, सेवानिवृत्त शिक्षक मक्तापूर, हे मंडळीचे कारभारी असतां यांनीं डॉ. फेअरबँक साहेबाविषयीं एक आठवण सांगितली. एकदां हंगामाचा दानधर्म जमा होत असतां एका शेतकऱ्यानें दोन्ही मुठींत पैसे आणले आणि वडीलसाहेबास विचारले, "कोणत्या हातांतील दान देऊं ?" "देवानें आपल्याला दोन्ही हातांनीं दिलें आहे." हें सूज्ञपणाचें साहेबांचें उत्तर पाटलानें ऐकून त्यानें एका हातांतील ५ रुपये आणि दुसऱ्या हातांतील १० रुपये थोर मनानें देवाच्या कार्यासाठीं दिलें.

## शांतिदूत आणि समान दृष्टि

श्री. ग. ग. साळवी, सेवानिवृत्त शिक्षक, सातारा म्हणतात– रे. डॉ. इ. फेअरबँक–साहेब शांतीचें भोक्ते होते. शांति हा त्यांचा संदेश असे. हंसतहंसत आणि शांतवृत्तीनें ते सर्व कामें करवून घेत. त्यांची वागणूक समानतेची असे. ते कोणालाही कमी लेखीत नसत म्हणून सर्व लोक त्यांच्यावर प्रसन्न असत.

श्रीमती गो. मो. ओणावळे, सेवानिवृत्त शिक्षिका म्हणतात– वडाळा मिशनच्या मुलांमुलींचा भरणा मोठ्या प्रमाणांत अहमदनगर हायस्कूलांत व इतर ठिकाणीं किंडर–गार्टन ट्रेनिंगला, नर्सिंगला, कारखान्यांत. वेगवेगळ्या खात्यांत आणि ईश्वरीविद्येच्या वर्गांत होत असे. ते आपला शिक्षणक्रम पुरा करून बाहेर पडले आणि कुठल्याही खात्यांत काम करण्यास तरबेज झाले.

## राहुरी प्रांताची सेवा

राहुरी प्रांताचे मिशनरी रे. डॉ. डब्ल्यू. ओ. वालंटाईन साहेबांचा वडाळे येथील फेअरबँक घराण्याशीं नात्याचा संबंध होता. डॉ. वालंटाईन साहेबांच्या फर्लोंत ( रजेंत ) फेअरबँक साहेबांनीं राहुरी प्रांताची सेवा केली असें रे. ग. पी. भोंसले पाळकांनीं सांगितले. ते म्हणतात, साहेबांनीं मजबरोबर शाळांची देखरेख कसून केली. गरजवंतास मदत केली आणि माझी तर ३०० रुपयांची मोठी गरज वेळेवर भागविली. तिची फेड मी सहा महिन्यांनीं केली.

रे. जे. मल्लेल्ल, ( उस्मानाबाद ) म्हणतात– आम्ही उभयतां डॉ. व मिसेस फेअर–बँक यांच्याकडे वडाळ्यास पाहुणे म्हणून गेलों. त्यावेळीं त्यांनीं आमचें आगतस्वागत आणि आदरातिथ्य केलें. डॉ. फेअरबँक हे समतोल मनाचे मिशनरी होते. ते फार धार्मिकवृत्तीचे

डॉ. अ. ना. व ना. पानसरे
ग्रंथ संग्रह

होते. त्यांचे उपदेश बोधपर आणि स्फूर्तिदायक असल्यामुळें श्रोतृसमाजावर त्यांचा परिणाम होत असे. ते सेवानिवृत्त झाले तरी त्यांची मैत्री पत्ररूपानें आणि दरवर्षी नाताळ आणि नवीनवर्ष कार्ड भेट व शुभेच्छा या रूपानें कायम आहे.

## बारीकसारीक गोष्टींत लक्ष व उदार मन

(१) १९२० सालीं वडाळें येथें मी इंग्रजी पहिल्या इयत्तेंत शिकत होतो, असें रे. र. आ. हिवाळे लिहितात. रोगाच्या साथीमुळें बोर्डींग-शाळा ताबडतोब बंद करण्यांत आली. मुलें घरीं जाऊं लागली. मी माझें सर्व बाड एका गाठोड्यांत बांधून पाठीवर घेतलें आणि बंगल्यासमोरून जात होतो. फेअरबँक साहेबांनीं तें पाहिलें. माझ्या वयाच्या आणि शक्तीच्या मानानें तें ओझें मोठें होते. हें पाहून त्यांना आश्चर्य वाटले. तेव्हां साहेब मला म्हणाले, "रत्नाकर, एवढें मोठें ओझें घेऊन तूं कसा जाशील ?" मी गोंधळून गेलों. तेव्हां त्यांनीं एका मोठ्या मुलाला माझ्या सोबतीला देऊन माझी सोय केली. बारीकसारीक गोष्टींत देखील ते किती लक्ष घालीत होते हें यावरून दिसून येतें.

(२) कॉलेजमध्यें शिक्षण घेण्यास मी नागपुरास गेलों. तेव्हां मी वडील फेअरबँक-साहेबास पत्र पाठविले कीं, मला कांहीं मदत करा. पण त्यांनीं मला लिहिलें कीं, रत्नाकरराव, सध्यां पैसे नाहींत. पुढें सहामाही परीक्षा झाली. मी साहेबांना लिहिलें कीं, परीक्षेंत माझा दुसरा नंबर आला. हें कळतांच साहेबांनीं मला ५० रु. पाठवून दिले. मदत अगदीं योग्यवेळीं मिळाली त्यामुळें शिक्षणांत खंड पडला नाहीं.

## डॉ. फेअरबँकसाहेब व मडमसाहेब यांचा पुरांतून बचाव

मे. हुसेनखान कमालखान, वडाळा मिशन म्हणतात- पपा फेअरबँक, मदर फेअर-बँक आणि आमचे वडील नगराहून वडाळ्यास मोटारनें येत होते. संध्याकाळची वेळ होती. घोडेगांवच्या नदीला पूर आला होता. मोटार पाण्यांत घातली. पलिकडे व्यवस्थित जाईल असें वाटलें. पण पुराचें पाणी वाढलें आणि मोटार वाहात जाऊन फरशीवरून खालीं खड्ड्यांत गेली. सुदैवानें ती उलटली नाहीं हें फार बरें झालें. त्यांचा देवावर मोठा विश्वास होता. त्यांनीं याप्रसंगीं देवबापाची आग्रहानें प्रार्थना केली व ती त्यानें ऐकली. पाणी ओसरलें. देवानें त्यास पुरांतून वांचविलें आणि ते सुखरूप बाहेर पडले. ते वडाळ्यास आल्यावर चर्चमध्यें उपकारस्तुतीची प्रार्थना केली.

## मला निराश केले नाहीं किंवा मी कॉलेजला कसा गेलों

मी १९२४ सालीं मॅट्रिक पास झालों, असें रे. नाथानराव हिवाळे सांगतात. मग मी वडील फेअरबँक साहेबांना वडाळ्यास जाऊन भेटलों व त्यांस म्हणालों, माझी कॉलेजांत जाण्याची इच्छा आहे. साहेब म्हणाले, " नाथानराव, तुम्ही पास झाला म्हणून मला आनंद वाटलो. पण मी उघडा आहे. "

मी:- साहेब, मला तुमचा सल्ला पाहिजे.

साहेब थबकले व म्हणाले, "कोणता सल्ला ?"

मी:– मला कॉलेजांत कसें जातां येईल ?

साहेब म्हणाले, "भास्करराव हिवाळे हे तुमच्यापुढें उदाहरण आहेत. भास्कर–रावांनीं स्वतःच्या पायावर उभे राहून शिक्षण केलें. तुम्हीहि तेंच करा." पुढें मी कोल्हा–पुरास राजाराम कॉलेजमध्यें शिकायला गेलों. तेव्हां साहेबांनीं वर्षभर दरमहा ५ रु. आणि मुंबईस विल्सन कॉलेजांत दुसऱ्या वर्षासाठीं गेलों तेव्हांहि दरमहा १० रु.ची मदत केली. पैशांबरोबर त्यांची लहानलहान उत्तेजनाचीं पत्रेंहि येत.

## काम करून शिक्षण

वडीलसाहेब असें सांगत असत कीं, रॉबर्टबाबा एका खानावळींत वाढप्याचें काम करून जेवणाचा व शिक्षणाचा खर्च भागवीत असे. मडमसाहेब बाबाला म्हणाल्या, बॉब, तुझ्या वडिलांनीं माझ्यासाठीं कांहीं रक्कम ठेविली आहे. त्यांतून मी तुझ्या शिक्षणासाठीं कांहीं रक्कम देतें. कारण तूं अशारीतीनें काम करून खर्च भागवीत आहेस हें मला पाह–वत नाही. पण बाबानें उत्तर केलें, आई, तुझ्यासाठीं माझ्या वडिलानें ठेवलेल्या रकमेंतून पैसे घेण्यास मला संकोच वाटतो.

काम करून शिक्षण संपादन करावें हा धडा तुम्ही मला लहानपणींच दिला ना ? यहुदी लोकांच्या मुलांप्रमाणें उद्योगाचें बाळकडू त्यांस लहानपणीं पाजलेलें असतें. स्वाव–लंबन हें अमोल असतें. हा धडा त्यांनीं आम्हां सर्व ख्रिस्ती बंधु–भगिनीस घालून दिला आहे, असेंच म्हणावें लागेल.

## आदर्श ख्रिस्ती ग्रामांचा निर्माता

**चिलेखनवाडीच्या शाळेची स्थापना–** श्री. स. के. कांबळे, उपाध्यापक नं. १ ओ. सी. पी. एम्. स्कूल वडाळा–मिशन लिहितात–डॉ. फेअरबँक साहेब शुभवर्तमानाच्या फेरी–वर असतां आमच्या गांवचे लोक त्यांस म्हणाले, "आमच्या गांवीं मिशनाची शाळा उघ–डावी." साहेब म्हणाले, "तुमच्या येथें मी अवश्य शाळा उघडीन, परंतु ती एका अटीवर, आणि ती म्हणजे तुम्ही तमाशा करण्याचें एकदम बंद करावें."

"आमची सर्व तमाशाची वाद्यें येथें आणून फोडावीत कां ?" असें ग्रामस्थांनीं साहेबास विचारलें. साहेब म्हणाले, "तसें करण्याची गरज नाहीं. तुमच्या मनाची पूर्ण तयारी झाली आहे असें येथील तुमच्या वागणुकीवरून मला दिसते."

ग्रामस्थांनीं साहेबांच्या म्हणण्यास तावडतोब कबुली दिली म्हणून १९३४ सालीं साहेबांनीं चिलेखनवाडीस शाळा उघडली. त्या शाळेच्या द्वारें शैक्षणिक आणि धार्मिक कामामध्यें चांगली प्रगति झाली.

## रावसाहेब पंडित, मामलेदार नेवासे यांची साक्ष

वडाळा–मिशन येथें ग्रामोद्धार वर्ग भरला असतां ते म्हणाले, प्रत्येक वस्तु उपयोगी आहे, पण जेव्हां मनुष्य तिचा दुरुपयोग करितो तेव्हां ती अपायकारक होते. मनुष्य मळ करितो पण देव त्या मळाचा शेतांत उपयोग करून घेतो. पतितास पावन करणें हें देवाचें काम आहे.

लिहिणें, वाचणें यांत पूर्ण सुधारणा नाहीं. सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्यास लावणें, जोडधंदे करण्यास उत्तेजन देणें, एकजुटीनें म्हणजे संघशक्तीनें गांवचे रस्ते नीट करण्यास गांवकऱ्यांत हौस आणि धमक उत्पन्न करणें हें आपलें काम आहे, कार्याचे डोंगर पडले आहेत, पण कार्य करणारी माणसें निर्माण झाली पाहिजेत, असें गोखल्यांचे म्हणणें आहे.

मिशनरी उद्योगी आहेत व त्यांचें काम सत्य आहे म्हणून त्यांस धन्यवाद दिला पाहिजे. मिशन कामदार चांगली माणसें आहेत असा माझा अनुभव आहे आणि फेअरबँक पितापुत्रांनीं चालविलेलें खेड्यापाड्यांच्या उन्नतीचें कार्य स्तुत्य आहे.

## शुभवर्तमानाची फेरी करीत असतां कामाची आस्था

रे. बि. कृ. गायकवाड, सेवानिवृत्त पाळक, नेवासा म्हणतात– वडील फेअरबँक–साहेब पिंपरी सर्कलमध्यें शुभवर्तमानाची फेरी करीत असतां त्यांची सायकल पंक्चर ( नादुरुस्त ) झाली. लवकर दुरुस्त होईना तेव्हां भक्तिप्रसंगासाठीं उशीर होऊं नये म्हणून मठाच्या वाडीपासून शहर टाकळीपर्यंत सुवार्तिक मिशनरी डॉ. फेअरबँक पायीं धांवत पळत आले. त्यांच्या कपाळावरून घामाचे थेंब निथळत होते. धन्य त्या मिशनरीची ! सुवार्ता प्रसार आणि त्यासंबंधीं आस्था हेंच त्यांचें ध्येय होते. त्यांनीं नेमलेल्या वेळीं सुवार्ता गाजविली.

## अपराधाची कबुली, क्षमा आणि शांति

महाराष्ट्रांतील यत्न करणाऱ्या सभेचें संमेलन कोल्हापूर मुक्कामी भरलें होतें. प्रस्तुत लेखक आमंत्रणावरून संमेलनास हजर झाले. कोल्हापूर येथील आर्विन हायस्कूलचे हेड्मास्तर श्री. मा. चां. गोर्डे, बी. ए. बी. टी. यांनीं रे. डॉ. इ. फेअरबँक साहेबांस या संमेलनाचे मुख्य वक्ते म्हणून भाषण करण्यास बोलाविलें होते. एका बैठकीचा विषय " पश्चात्ताप " हा होता. डॉ. फेअरबँक साहेब या विषयावर बोलत असतां त्यांनीं आपली स्वतःची गोष्ट सांगितली.

ते म्हणाले, " लहान मुलगा असतांना मी माझ्या काकाची खोडी केली. मी त्यांची कामाची अरी गुपचूप उचलून अडगळींत फेकून दिली. मी खेळण्यास बाहेर पसार झालो. माझ्या काकाला त्या अरीची गरज लागली. ते शोधूं लागले. दोनतीन दिवस त्यांचा

खोळंबा झाला. मी आपलें मन घट्ट केलें. अरीविषयीं कोणाजवळहि ब्र शब्द काढला नाहीं. नंतर माझें मन मला टोंचूं लागलें. काकाला प्रथम सांगण्याचें मात्र धैर्य होईना. शेवटीं मनाचा निश्चय केला. अरी शोधून काढली. काकाच्या समोर भीतभीत जाऊन उभा राहिलों. खालीं मान करून म्हणालों, "तुमची अरी घेऊन जाणारा आणि लबाडी करणारा खोडकर मुलगा मीच! मी तुमचा मोठा गुन्हा केला आहे. मला आतां त्याबद्दल वाईट वाटतें. मी पुन्हां तसें करणार नाहीं. मला क्षमा करा."

हें ऐकून माझे काका म्हणाले, "बाळ, शाबास! अरी फार किंमतीची वस्तु नाही, पण उपयुक्त आहे. तूं आपली लहानशी चूक का होईना ती मजसमोर आणि देवासमोर कबूल केली आहेस म्हणून मला फार आनंद होत आहे. तूं मोठा धार्मिक पुढारी आणि देवभक्त होईल अशी माझी खात्री आहे." आपल्या काकाचे हे प्रेमळ आणि क्षमेचे शब्द ऐकून मला आनंद झाला. तेव्हांपासून लबाडी, खोडी, द्वेष, मत्सर वगैरे पापें न करितां प्रभु येशूख्रिस्त हा कित्ता पुढें ठेऊन निर्दोष, निष्कलंक आणि पवित्र असें धार्मिकतेचें जिणें जगण्याचा निश्चय केला.

डॉ. फेअरबँक साहेबांच्या भाषणाचा परिणाम श्रोतृसमाजावर चांगला झाला.

## डॉ. व मिसेस फेअरबँक यांचें फर्लोवर जाणें

वडाळयाचे प्रसिद्ध मिशनरी रे. इ. फेअरबँक हे आपल्या पत्नीसह स्वदेशी जात आहेत. त्यांच्या प्रेमळ व गोड स्वभावाचा वडाळकरास जो अनुभव आलेला आहे, त्या अनुभवाची साक्ष रे. वि. गायकवाड यांनीं "**प्रेमगीत**" या मथळयाखालीं कवितेवरून दिली आहे. "धन, ज्ञान आणि अधिकार ह्यांच्या जोरावर कार्य केलें असतां त्या कार्याला कांहीं काळ खुलून रंग चढलेला दिसतो, पण धार्मिकतेच्या जोरावर कार्य केलें असतां त्या कार्याची गति मंदमंद भासली, तरी तिला निश्चित स्वरूप येत असते!"

रे. रॉबर्ट फेअरबँक हे वडाळयांत काम करणाऱ्या फेअरबँक घराण्यांतील तिसरी पिढी होय.

वडाळें एकेकाळीं "बहिरोबाचें" होतें. पण आज तेंच "**वडाळा–मिशन**" या नांवानें ओळखण्यांत येते. ही और क्रांति डॉ. फेअरबँक या कार्यकर्त्या माणसाच्या धार्मिकवृत्तीशिवाय झालेली नाहीं. शेवटीं रे. आणि मदर इ. फेअरबँक ह्यांच्यासाठीं कवीच्याच शब्दांत मीहि म्हणतों कीं,

"नित आयुर्बल अन सौख्य संपदा देवो ॥<br>
तो बाप दयाधन तुम्हां सदा सुखी ठेवो!"

अहमदनगर<br>
१४–४–१९२८

**हि. जी. राहाटोर**

अमेरिकन मराठी मिशनचे वयोवृद्ध सेवक रे. शां. ल. साळवी लिहितात कीं–

"वडाळें प्रांत ही माझी जन्मभूमि आहे. माझ्या वडिलानें चांद्यांत ५८ वर्षें सेवा करून मिशनरीची इच्छा नसतांही मी त्यास सेवानिवृत्त करून घेतलें. चांद्यांतच माझा जन्म झाला व १९०२ सालीं मी आपल्या सेवाकार्यास सुरुवात केली. १९०८ मध्यें मी वडाळयांतून नगरास गेलों. तेथें भिन्नभिन्न प्रकारची सेवा करून मी १९४६ सालीं सेवा-निवृत्त झालों. तरी तेथेंच राहून १९५४ पर्यंत हातीं येईल ती सेवा करीत राहिलों. माझ्या संपूर्ण सेवेंत जी यश प्राप्ती लाभली, तिचें फार मोठें श्रेय डॉ. फेअरबँकलाच देणें भाग आहे. या प्रकरणीं मला एका इंग्रजी म्हणीची आठवण येते. "Well begun is half done" म्हणजे प्रारंभीचाच पाया भरभक्कम घातला कीं, कार्यभाग अर्धा आटो-पयांत आला असें समजावें. तीन घटना क्रांतीची मला मोठ्या कृतज्ञतेनें आठवण येते.–

## (१) पंडित होण्यास दिलेली स्फूर्ति व गति

१९०५ च्या नोव्हेंबर महिन्यांत रेव्ह. व मिसेस क्लार्क हें दांपत्य वडाळयांत येऊन थडकलें. त्या खेड्यांत कोणीही सुशिक्षित ब्राह्मण नव्हता. तेव्हां फेअरबँक साहेबांनीं मला बोलावून म्हटलें, "शांतवनराव, तुम्ही या नवीन जोडप्याला मराठी शिकवा." अत्यंत शंकित वाणीनें मी म्हणालों कीं, "साहेब, मला तें कसें जमेल ?" "तुम्हाला इंग्रजी चांगलें येते व शिकविण्याची तुम्हाला हौस आहे. तुम्हाला तें करितां येईल, अशी मला खात्री वाटते." ती आज्ञा मानून मी पंडितपणाला प्रारंभ केला. क्लार्क साहेब खुद्द चांगले शिक्षक होते. ते मला शिक्षणपद्धति दाखवित व तिच्या अनुरोधानें मी त्यांना मराठी शिकवूं लागलों. मी एक चांगला पंडित होईन अशीं चिन्हें दोनतीन आठवड्यांत दिसून आलीं. क्लार्क जोडपें १९०६ च्या मार्च महिन्यांतच महाबळेश्वरच्या भाषा-शाळेस निघून गेलें व "शाळा बंद झाल्यावर तुम्ही महाबळेश्वरला या" अशी मला आज्ञा देण्यांत आली. आतां काय माझा आनंद गगनांत मावेना ! हमालबटलेरांनीं महाबळेश्वर पाहावें, पण मज-सारख्याला तें कसें दिसेल !

एप्रिलच्या मध्यान्हीला शाळा बंद झाल्यावर निघण्याचा निर्णय घेतला. जय्यत तयारी केली. वडाळयाहून निघून अहमदनगरला येऊन ठेपलों. चर्चिल साहेबांच्या कार-खान्यांत एक नातेवाईक होता. त्याला भेटावयास गेल्यावर खुद्द चर्चिलसाहेब समोरून आले. मी त्यांस नम्रतापूर्वक नमन केल्यावर मी कोण म्हणून त्यांनीं विचारलें, "हें माझे अंकल असून महाबळेश्वरला चालले आहेत." असें सांगण्यांत आलें. "कशाला ?" असें विचारिलें तेव्हां "हे पंडित म्हणून जात आहेत." असें सांगण्यांत आलें. साहेबांनीं मजकडे खालीवर पाहून विचारलें, "तुम्ही ब्राह्मण आहां काय ?" "नाहीं" असें म्हटल्यावर "तुमची आई तरी ब्राह्मणीण होती काय ?" "नाहीं" असें उत्तर दिलें. त्यावर साहे-बांनीं जोरदार शब्दांत मला बजावलें कीं, "तुम्ही परत वडाळयास जा. ब्राह्मणाखेरीज कोणालाच पंडितपणा करितां येणार नाहीं; जा, जा, वडाळयाला परत !" मी थंडावून गेलों ! काय करावें समजेना. माझ्या मित्र-मंडळीनें मोठ्या थाटानें माझी रवानगी

केलेली होती. किंचितसा निश्चयी स्वभाव असल्यामुळें मी मनाशींच म्हणालों, हा अपमान घेऊन नगरांतून परतण्यापेक्षां महाबळेश्वरची डोंगरझाडी तरी पाहून परतावें असें म्हणून पुढें गेलों, पण मन कांहीं निर्धास्त नव्हतें.

पोंचलो महाबळेश्वरला जाऊन. सकाळींच क्लार्कसाहेब भेटावयास आले. रोज तीन तास शिकविण्याची बोली असून महिन्याला मला २४ रु. मिळावयाचे होते. क्लार्क साहेब मला म्हणाले, "शांतवनराव, सर्व मिशनेरींचें असें स्पष्ट सांगणें आहे कीं, वडाळयांत कोणी ब्राह्मण पंडित नाहीं म्हणून येथें ब्राह्मणांकडून दोन तास तरी शिकावें." आतां माझे हातपाय गळाले. अवघ्या ८ रुपयांत मी कसें भागवूं ?" क्लार्क साहेबानें पुढें असा सवाल केला कीं, तुम्ही दुसऱ्या कोणाला शिकवाल कां ? मी होय असें उत्तर दिलें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं क्लार्क साहेब मला भेटण्यासाठीं परत आले. ते म्हणाले, "नगरचे चर्चिल साहेब तुम्हाला ठाऊक आहेत का ? त्यांना एक तास शिकवा." आतां कोण माझी गाळण ? ज्यानें मला नगरांतूनच परत वडाळयाकडे तोंड फिरव असें सांगि-गितलें होते, त्यालाच मी महाबळेश्वरांत तोंड कसें दाखवूं ? तरी मी धीर सोडला नाहीं. ८ दिवसांनीं ते जबरी साहेब आले ! गेलों त्यांना भेटायला. "तुम्ही मला शिकविणार काय ?" हा सवाल ऐकतांच हातपाय गळून गेले. पण धीर धरून धैर्यानें म्हटलें, "होय, साहेब ! ! "बरें तर तीन गोष्टीं ध्यानांत ठेवा. एकतर मला **शब्द पाठ करण्यास** सांगूं नका; दुसरी तर मला **लिहिणें-वाचणें** शिकवूं नका आणि तिसरी गोष्ट मला **व्याकरण** शिकवूं नका. मला माझ्या भाषेचेंच व्याकरण येत नाहीं." झालें ! आतां प्रगति कशी काय करणार ! !

पटणशक्तीनें शब्दसंग्रह वाढवावयाचा नाहीं. लिहून वाचून भाषा ज्ञान द्यावयाचें नाहीं आणि व्याकरणाची नियमावली द्यावयाची नाही. पण हीच नैसर्गिकपद्धति मुलांना बोलण्याच्या कामीं आम्ही अवलंबितों. हिलाच इंग्रजींत डायरेक्ट मेथड ( Direct method ) म्हणतात व ही डॉ. एडवर्ड फेअरबँकनें मला दाखविली. तिच्या साह्यानें मी मि. चर्चिल साहेबांस शिकवूं लागलों. या नव्या पद्धतीची सुलभता आणि त्यांमधील यश पाहून चर्चिल साहेबांनीं तीन चार दिवसांतच "मला आणखी एक तास शिकवाल का ?" अशी विचारणा केली. महिना भरल्यावर मला ८ रुपयाप्रमाणें नव्हे, तर ब्राह्मण पंडितापेक्षां २ रु. अधिक देऊन माझ्या शिक्षणाची त्यांनीं वाहवा केली ! पुढें मी यशस्वी पंडित बनलों. पहिल्याच वर्षीं जेथें मला अवघे २४ रु. मिळाले, त्याच भाषा-शाळेमध्यें २००/२५० रु. पगारावर नुसता पंडितच नव्हे तर त्या शाळेवर मला दोनदां सुपरिटेंडेन्ट करण्यांत आले, यांत मी माझ्या हुशारीची टिमकी वाजवीत नाहीं, तर डॉ. फेअरबँकच्या उत्तेजनानें आणि मार्गदर्शनानेंच मला हा प्रगतिमार्ग लाभला होता, हें मी पूर्णपणें जाणून आहे. म्हणूनच अत्यंत कृतज्ञतेनें मला त्यांची आठवण येते.

## (२) खेड्यापाड्यांतील शाळा व त्यांचा दर्जा

डॉ. हेन्री फेअरबँक निवर्तल्यावर डिव्हिनिटी कॉलेजचें काम संभाळून मला कोळ-

गांव प्रांताची देखरेख करण्याची जबाबदारी देण्यांत आली. हळूहळू तो प्रांत वाढत जाऊन जेऊर व पारनेर प्रांताचा कांहीं भाग मिळून तो अहमदनगर हा मोठा प्रांत झाला. आरंभीं-आरंभीं ६।७ च खेडयांतून शाळा होत्या व त्यांची वार्षिक सरकारी ग्रँट दोन अडीचशें रुपये मिळत असे. वडाळें प्रांतांत अधिक शाळा असून त्यांना हजारांनीं ग्रँट मिळत असे. तें कां व कसें मिळवावें हें समजून घेण्याची मला मोठी जिज्ञासा झाली. या प्रकरणीं मी डॉ. फेअरबँकसाहेबांची मुलाखत घेतली. सेवेंत प्रगति करण्याची माझी हौस पाहून साहे-बास फार कौतुक वाटलें. जवळ घेऊन मला त्यांनीं त्यांतलें मर्म समजावून सांगितलें. प्राथ-मिक शाळाचे ए व बी असे दोन वर्ग असतात. बी वर्गाला कांहीं महत्व नसे. ए वर्ग उच्च दर्जाचा असून त्याला भरगच्ची ग्रँट मिळत असते. ए वर्गाच्या शाळेस ट्रेंड शिक्षक अवश्य, इतकेच नव्हे, त्या शाळेच्या हेडमास्तरला मनमिळाऊपणाची गोडी असावी लागते. आई-बापांचाच नव्हे, तर गांवकरी जनतेचा सहकार अवश्य लागतो, असें मला सांगण्यांत आलें. मी परतल्यावर ट्रेंड आणि फार गोड स्वभावाचे शिक्षक मिळविलें. जेथें ६।७ च शाळा होत्या. तेथें आतां १४।१५ शाळा झाल्या व जेथें तीनशेंपेक्षां अधिक ग्रँट नसे तेथें तीन हजारांचें ग्रँट मिळवून आम्ही लोकप्रिय अधिकारी झालों. हें सर्व कोणाच्या स्फूर्तीनें व मार्गदर्शनानें झालें? रे. डॉ. एडवर्ड फेअरबँकच्याच. म्हणून एखादी प्राथमिक शाळा दिसली कीं अत्यंत कृतज्ञतेनें मला साहेबांची आठवण येते. Association of idea म्हणजे विचार संग-तीची घटना माझ्यापुढें उभी राहाते. ह्या विचारसरणींत मला फेअरबँक साहेबाचें कृतज्ञतापूर्वक स्मरण होतें.

## (३) प्रांतांतील खेडयापाडयांतून सर्व जातीशीं संबंध व सहकार्य देणें-घेणें

१९०२ पासून १९०८ पर्यंत वडाळयांत सेवाकार्य केलें. तेव्हां एक विलक्षण बीं माझ्या मनांत पेरलें गेलें. पुढें १९३० मध्यें डिव्हिनिटी कॉलेज पुण्याला गेल्यावर मी सर्वस्वी प्रांताधिकारी झालों. तेव्हां तें वडाळयांत पेरलेलें बीं उगवूं लागलें! वडाळयांत असतांना साहेबांच्या बंगल्यावर निरनिराळया खेडयांतून निरनिराळया जातींच्या अडच-णींत सांपडलेल्या लोकांची रीघ लागलेली मी पाहात असें. हें काय प्रकरण असावें हें पाहा-ण्यास व समजून घेण्यास मी व्हरांडयावर चोरून लपून बसत असे. साहेबांच्या ह्या कचे-रींत नानाविध भानगडी निघत. शांतपणें त्या समजून घ्याव्यात व प्रेमळपणाच्या वाणीनें तडजोड व सलोखा घडवून आणावा. कधींकधीं साहेबवर्य अत्यंत मोकळेपणानें उलटसुलटे प्रश्न करून सलोखा घडवून आणीत. जे उभयपक्ष बंगल्यांत शिरतांना एकमेकांकडे डोळे वटारून पाहात, तेच बाहेर निघाल्यावर हातांत हात घालून सरळपणानें आपल्या घरीं जात. असा साहेबांच्या कामगिरीच्या प्रयत्नाचा प्रताप होता. "समेट करणारे ते धन्य." हें ख्रिस्तवाक्य साहेब खेडयापाडयांतून अहोरात्र गाजवीत असत.

आणखी एक आठवण दिल्याखेरीज राहवत नाही. सरकारी अधिकारी फिरतीवर निघत असत तेव्हां वडाळयांत साहेब त्यांचा मोठा आदरयुक्त पाहुणचार करीत. या मैत्रीमुळें साहेब मजकुरांच्या बंगल्यांतील खाजगी कचेरीला फार महत्व येई. साहेब कांहीं

म।६६०८

684



कायदेपंडित नव्हते. पण त्यांची तडजोड केवळ सत्याच्या व प्रेमाच्या सामर्थ्यानें घडून येई व ती सरकारी अधिकारी मान्य करीत असत. वडाळ्यांतील त्या निरीक्षणाचें बीं माझ्या प्रांतीय कारभारांत चांगलेच उगवलें ? सरकारी–दरबारीं मी आपलें वजन व लोकप्रियता अशी निर्माण केली कीं कोणत्याही गांवचा व जातीचा सलोखा करण्यांत मला यश येई. असो, मी आपलें चरित्र येथें सांगत नाहीं, पण डॉ. फेअरबँक साहेबांच्या उदाहरणानेंच मला कांहीं दानें मिळाली, त्यांची मी कृतज्ञतेनें आठवण करीत आहे. ख्रिस्ती जीवनाला गति देणाऱ्या असल्या साधूची आठवण कां राहणार नाहीं ? पुरातन काळच्या कबिरानें आपल्या दोहऱ्यांत यथायोग्यच म्हटलें आहे कीं,:–

"सुरतसे किरत बडी । बिनपंखसे उडजाय ॥
सुरत तो जाती रही । किरत कबु न जाय ॥"

( Good name is greater than beauty, which flies on without wings. Beauty passes away, but good name never disappears. )

## फेअरबँक घराण्याचा आश्रय

रे. दा. आ. पटेकर म्हणतात– दुष्काळांत आमच्या आजीला आणि आईबापांना रे. हेन्री फेअरबँकसाहेबांचा आश्रय मिळाला. त्यांनीं त्यांच्या संगोपनाची, शिक्षणाची आणि कामाची व्यवस्था केली. नंतर रे. हेन्री फेअरबँकसाहेब नगरास बदलून गेल्यावर रे. इ. फेअरबँकसाहेब काम पाहूं लागले. आमच्या वडिलांनीं दोन्ही मिशनरींच्या हाताखालीं शिक्षक आणि सुवार्तिक म्हणून १६ वर्षें सेवा केली.

मी अहमदनगर मक्कामी अमे. मि. मुलांच्या हायस्कूलांत शिक्षण घेऊं लागलों. रे. इ. फेअरबँकसाहेब अमेरिकेस रजेवर गेले होते. आमचे वडील आजारी होऊन नगरास आले आणि १।२ दिवसांत मरण पावले. लोक हळहळूं लागले आणि म्हणाले, "आजीबाई, मास्तरीणबाई आणि मुलें उघडी पडली. त्यांचा आश्रयदाता आतां येथें नाहीं. यांचें कसें होईल ? "

नगरास असलेले मिशनरी रे. हेन्री फेअरबँकसाहेब यांनीं आपल्या बंधूस आमच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी अमेरिकेस कळविली. ही दुखःद बातमी कळतांच साहेबांनीं व मडमसाहेबांनीं पत्रानें आमचें सांत्वन केलें आणि आमच्या शिक्षणाची व्यवस्था चालूं ठेविली. पांच सहा महिन्यानंतर ते रजेहून आले आणि भेंडेगांवीं जाऊन आमच्या प्रिय आप्तेष्टांचें सांत्वन केलें. आमच्या आजीस व आईस १५ रुपये बकरी आणि कोंबडया घेण्यास दिले आणि जवळच्या १।२ खेड्यास आठवडयांतून एकदां बायबलवूइमनसारखे काम करण्यास सांगितले आणि त्याबद्दल दरमहा १५ रु. देत जाऊं असें म्हणाले. आमच्या शिक्षणाची व्यवस्था तर अगोदरच केली होती. हें सर्व ऐकून गांवच्या लोकांना आणि आम्हांला आनंद वाटला. आम्ही त्यांचे उपकार मानिले. लोक म्हणाले, यांना फेअरबँक

के. प. म. व वा. पोलवाप

घराण्याचा पुन्हा आश्रय मिळाला. हे मिशनरी खरोखर दयाळू असून अनाथांचे वाली आणि विधवांचे कैवारी आहेत !

## शाळेची शिस्त

माझें हायस्कूलचें शिक्षण संपल्यावर कुकाणें मुक्कामी मिशन शाळेवर साहेबांनीं मला शिक्षक नेमिले. " छडी लागे छमछम। विद्या येई घमघम। या जुन्या रूढीप्रमाणें मी मेजावर छडी ठेवली होती. साहेब शाळा तपासण्यास आले. थोडी चांचणी घेतल्यावर जाण्यापूर्वीं त्यांनीं मला एक सूचना केली. कारण त्यांनीं छडी पाहिली होती.

मुलांच्या समोर माझा अपमान होऊं नये म्हणून ते इंग्रजींत म्हणाले, Davidrao, Is this the way to influence the boys ? डेविडराव, मुलांवर वजन पाडण्याचा हाच मार्ग आहे काय ? मी ओशाळलों. पण साहेबांना, इंग्रजींतूनच उत्तर दिलें, " No Sir, this is not the way to influence the boys. Please, excuse me. I shall never do it again. Thank you very much for your valuable suggestion. नाहीं सर, मुलांवर वजन पाडण्याचा हा मार्ग नाहीं. मला क्षमा करा. छडीचा वापर मी पुन्हाः करणार नाहीं. ह्या तुमच्या मौल्यवान् सूचनेबद्दल मी तुमचे फार उपकार मानितों." माझें म्हणणें ऐकून साहेब निघून गेले. पण मी पुढें छडीचा उपयोग केव्हांच केला नाहीं. साहेबांच्या लहानशा परिणामकारी वाक्यावरून मी उत्तम धडा शिकलों. वरील गोष्टीमुळें साहेबांचें माझ्यावरील प्रेम कमी झाले नाहीं.

## सरकारी इन्स्पेक्टरची शिफारस

दुसऱ्या वेळेस सरकारी इन्स्पेक्टर श्री. गोडबोलेसाहेब शाळेची पाहणी करण्यास आले. त्यांनीं माझ्या शाळेची परीक्षा घेतली आणि उत्तम शेरा दिला. माझी माहिती विचारली, आणि नगरला जाण्यापूर्वी वडाळ्यास फेअरबँकसाहेबास जाऊन भेटले व म्हणाले, " साहेब, कुकाण्यास काम करीत असलेल्या पटेकर शिक्षकाचें काम चांगलें आहे. प्रांतांतील कोणत्याच शाळेवर ७ वी इंग्रजी शिकलेला ( आतांची ११ वी इयत्ता ) शिक्षक नाहीं. या तरुणाची आयुष्याची नुकसान होऊं नये म्हणून त्याला ठाण्याच्या मुख्य शाळेवर ठेवा. " फेअरबँकसाहेबांनीं इन्स्पेक्टरसाहेबांस एकाच अर्थभरीत वाक्यांत उत्तर दिलें, " या तरुणाचें काय करावें याविषयीं योजना चालू आहे ! "

## ईश्वरीविद्येच्या वर्गांत प्रवेश

मी वडाळ्याच्या शाळेंतून घरीं सुट्टीस गेल्यावर योसेफची नाटिका करण्यांत भाग घेत असे. शाळामास्तर झाल्यावर वडाळा प्रांतिक मेळ्याच्या वेळेस साहेबांनीं माझें भाषण ऐकलें होते. माझे वडील धर्मोपदेशक असतांनाच स्वर्गवासी झाले होते. माझाहि कल धार्मिक गोष्टीकडे आहे हें जाणून साहेबांनीं पाळक वर्गासाठीं माझी शिफारस केली.

महाबळेश्वराहून साहेबांनीं मला लिहिलें, "डेविडराव, पाळक वर्गासाठीं तुमचें नांव सुचविलें आहे. चार वर्षांचा वर्ग इंग्रजींतून शिकवितील. तुम्हाला अभ्यास होईल कां? अनुकुल उत्तर आल्यास (१९१७) जूनच्या पहिल्या आठवड्यांत वडाळ्यास हजर राहा. इंग्रजी आणि बायबल या दोन विषयांची प्रवेश परीक्षा होईल. पास झाल्यास वर्गास पाठवूं."

मी साहेबांस 'होय' असें उत्तर पाठविलें आणि श्री. शा. तु. नवगिरे, श्री. प्र. जी. राहाटोर, श्री. सु. तु. देडे, श्री. र. मो. ओणावळे यांच्याबरोबर परीक्षेस आलों. पहिला पेपर "पवित्रशास्त्र" विषयीं होता. आम्ही मेजाभोंवती परीक्षेस बसलों. साहेब आंत जाऊन आले. त्यांनीं मोठें टरबूज कापून आम्हांस अर्धें आणून दिलें आणि म्हणाले, "भावांनो, प्रश्न सोडवितां सोडवितां टरबूज खा." आम्हांला नवल वाटलें. आनंद वाटला आणि आम्ही त्यांचें उपकार मानिलें. आदरातिथ्याचा नमुना दृष्टीस पडला!

दुपारीं दुसरी परीक्षा देऊन गांवोगांवीं गेलों. चार दिवसांनीं उत्तरें आली कीं, तुम्ही सर्वजण परीक्षेंत पास झाला आहांत, जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत पाळक वर्गांत शिकायला जा, आणि तेथें रे. डॉ. आर. ए. ह्यूम साहेबांस जाऊन भेटा. त्याप्रमाणें आम्ही पाळक वर्गांत शिकण्यास गेलों.

इन्स्पेक्टर गोडबोले यांना साहेब म्हणाले होते कीं, या तरुणाचें काय करावें याविषयीं योजना चालू आहे. मला पाळक बनविण्याचीं हीच योजना साहेबांना अंमलांत आणावयाची होती! ती देवकृपेनें सिद्धीस गेली.

## आचार्यपदाची दीक्षा

१९३० सालीं अहमदनगर ह्यूम मेमोरियल चर्चमध्यें माझी दीक्षा होण्याचा प्रसंग ठरला. रे. शां. ल. साळवी या प्रांताचार्यांच्या हाताखालीं सनदी उपदेशक म्हणून काम करीत होतों. रे. साळवी प्रांताचार्यांच्या सूचनेवरुन माझ्या दीक्षाविधीप्रसंगी हजर राहून प्रार्थनेंत पुढारीपण करावें म्हणून रे. डॉ. ई. फेअरबँकसाहेबांस मी आमंत्रण दिलें. साहेबांस फार आनंद वाटला. त्यांनीं तांबडतोब आमंत्रण पत्करलें आणि दीक्षेच्या प्रसंगीं इतर आचार्यांबरोबर माझ्या मस्तकावर हात ठेऊन आग्रहानें आणि कळकळीनें कृपेची वृष्टि व्हावी म्हणून प्रार्थना केली. माझ्याठायीं तर नवचैतन्य उत्पन्न झालें. तेव्हांपासून सर्कल आचार्य म्हणून उत्तेजनानें काम करुं लागलों. त्या परमेश्वरालाच मान, महिमा आणि गौरव असो.

## ख्रिस्ती वाङ्मय

आमचे मित्र श्री. श. भि. अमोलिक, बेलापूर यांनीं मला पैशांची मदत केल्यामुळें "ग्रामोद्धार वर्गाचा अहवाल" वडाळा मिशन आणि डॉ. ई. फेअरबँकसाहेबांचें "**धर्म संजीवन**" ही पुस्तकें मला प्रकाशित करतां आलीं. त्यांच्या प्रत्येकीं ५०० प्रति मी फेअर-बँकसाहेबांकडे पाठवून दिल्या. त्या पाहून त्यांना आनंद वाटला. त्यांनीं त्या तांबडतोब निरनिराळ्या ठिकाणीं फुकट वांटण्यास पाठविल्या. "At the master's feet"

दे. म. म. द. बा. [illegible]
[illegible] संग्रह

( "प्रभुपदीं" या साधु सुंदरसिंगच्या पुस्तकाचें रुपांतर मी केले. ) तें ट्रॅक्ट अॅन्ड बुक सोसायटीच्या संचालक मिस्. ई. मोरलँड, डी. लिट् यांनीं प्रकाशित केलें. याची पहिली आवृत्ति खपल्यावर श्री. सु. द. करंदीकर यांनीं दुसरी आवृत्ति प्रकाशित केली. या पुस्तकाचा उल्लेख करण्याचें कारण हें कीं, रुपांतराची हस्तलिखित प्रत मी प्रथम डॉ. ई. फेअरबँकसाहेबाकडे पाठविली. ती साहेबांनीं आणि रे. जी. शे. गायकवाड यांनीं वाचून पाहिली व कांहीं भाग मिशन कामदारांना वाचून दाखविला आणि मला लिहिलें कीं हें पुस्तक छापण्यास योग्य आहे.

या वरील आठवणीचा सारांश– आमच्या आश्रयाचें ठिकाण वडाळा–मिशन आणि फेअरबँक घराणें. आमच्या उन्नतिचा आरंभ आणि कळस फेअरबँक घराणें. सर्व गोष्टींचे श्रेय त्यांनांच! त्याबद्दल आम्हीं त्यांचें अत्यंत ऋणीं असून देवबापाची स्तुति करितो.

## ते वडाळ्याचे साहेब आहेत

श्री. अनंतराव ससाणे यांना डॉ. फेअरबँकसाहेबांनीं सांगितलेली ही आठवण म्हणजे एक दैवी चमत्कारच म्हटला पाहिजे. ती आठवण अशी—

एकदां डॉ. फेअरबँकसाहेब अहमदनगराहून बँकेतून पैसे घेऊन जात होते. दुष्काळ पीडितांना मजुरी देण्याकरितां हे पैसे वापरावयाचे होते. दुष्काळामुळें सर्वत्र चोरांचा व लुटारुंचा सुळसुळाट झाला होता. चोरांच्या एका टोळीनें साहेबांना रस्त्यांत अडविले व त्यांना सायकलवरून उतरण्यास सांगितले. मग चोरांनीं साहेबांची झडती घेण्यास सुरवात केली. साहेब चोरांना कांहींएक अटकाव न करतां मनांत प्रार्थना करुन शांतपणें स्वतःची हकीकत सांगू लागले. त्या टोळीचा नायक जवळच टेहळणी करण्याकरितां दडून बसला होता. त्यानें साहेबांचा आवाज ओळखला व तेथूनच ओरडून म्हणाला, "अरे, ते वडाळ्याचे साहेब आहेत. त्यांना हात लावूं नका."

तो धांवतच तेथें आला. साहेबांची पैशांची पिशवी चोरांनीं आपल्या ताब्यांत घेतली होती. ती नायकानें साहेबांना परत केली. त्याच्या साथीदारांनीं साहेबाशीं केलेल्या दांडगाईच्या वर्तनाबद्दल त्यानें साहेबांची मनापासून क्षमा मागितली आणि तो साथीदारांस म्हणाला, "दुष्काळानें पिडलेल्या गोरगरिबांना आणि उपासतापास काढणाऱ्या लोकांना मदत करणारे आणि अनाथांचे वाली असे हे वडाळचाचे साहेब आहेत. त्यांची क्षमा मागा. साथीदारांनीं तसें केलें. मग नायक म्हणाला, "साहेब, दुसरी एक चोरांची टोळी घाटांत तुम्हांला न ओळखून तुम्हांला अडवून त्रास देईल. म्हणून तुम्ही एकटचानें जाऊं नये असें मला वाटतें, मी येतो तुम्हांला पोहोंचवायाला." त्या नायकानें आपल्या साथीदारांबरोबर साहेबांना थेट त्यांच्या बंगल्यावर सुखरूप नेऊन पोहोंचविलें.

नायकाची वरील साक्ष साहेबांच्या भरीव कामगिरीवर प्रकाश टाकते. देव आपल्या भक्तांचें संकटसमयीं रक्षण करितों, हा बोध घेण्यासारखा आहे.

# भाग ३ रा.

## प्रेमगीत

(जाति–भूपति)

ही नररत्नें का असली जन्मा येतीं ।
प्रभु कार्यास्तव जी देह नित्य वेचीतीं ॥
तो देश तयांचा दूर कितीतरी आहे ।
प्रिय आप्त त्यजोनी सांगा आले कां हे ? ॥
परि ईश्वर अपुलें कार्य करोनी घेई ।
हा दास फेअरबँक धाडीला लवलाही ॥
दिसमास वर्षें तीं कितीतरी ही झालीं ।
हो पस्तीस वरूषें । गणती कुणी कां केलीं ॥ ?
या हृदयपटावर स्मृति अजुनी राहे ।
तव कार्यक्षेत्र बा ठाम वाढतें आहे ॥
ही साक्ष तुमच्या सत्कार्याची महान् ।
बिनखर्ची दयाळु कोर्ट 'वडाळें' जाण ॥
किती लांबुनी येती, शेतकरी धांवूनी ।
हा 'समेटकर्ता' नांव असें ऐकूनी ॥
कुणी 'पंडित' म्हणुनी, लुब्ध गुणांवर होती ।
कुणी लेखक, ज्ञानी, वक्ता तुज बा म्हणती ॥
परि उज्वल याहून, पुढती तव सत्कीर्ती ।
'सन्मार्ग दर्शि तुज देवभक्त कीं म्हणती ॥
ही निष्ठा प्रभुवर, जणूं दुजा आराम ।
सहवास प्रभूचा, दुजे सुचेना काम ॥
करि नित्य काळजी प्रभुजीच्या कळपाची ।
ही कार्य चिकाटी दिसे साधु मोलाची ॥
ही सद्गुण माला गुंफायाला पुरती ।
मम लेखनींत ना उरली बारे शक्ती ॥
ह्या वियोग कालीं, हृदयीं येई भरतें ।
मा बाप चालले, त्यजुनी अमुचे नेते ॥
ये भरूनी यास्तव अमुचे हृदय कंठ ।
ते नेत्र अश्रुंनि, भरते कांठोकांठ ॥
हा वियोग कां ही एका दो दिवसाचा ।
कां सहन करावा, सर्व दीड वरुषाचा ॥

किती असह्य होती, विरहाच्या या ज्वाला ।
त्या आल्या जणुं कां, काळिज जाळायाला ? ।।
नित वाहत राहील, पूर असा अश्रूंचा ।
हा प्रणाम अमुचा, घ्या हो घ्या प्रेमाचा ।।
हे कृपा सागरा, कर दोन्ही जोडूनी ।
त्वत्पदिं लीन आम्ही, शिर्ष असें लववोनी ।।
परि संकटसमयीं, सहाय्यकर्त्या बापा ।
ने सुखरूप भक्ता, वारी अवघ्या तापा ।।
घ्या आतां अमुची, कंठी घाला माला ।
हो कारण अमुची, आठवण ठेवायाला ।।
नित आयुर्बल अन सौख्य संपदा देवो ।
तो बाप दयाघन तुम्हां सदा सुखी ठेवो ।।

ता. १४-४-१९२८ रे. वि. कृ. गायकवाड
वडाळा मिशन

## वडाळा प्रांताचे कर्मवीर मिशनरी

( चाल-श्रवणीं भक्तांच्या पडतें )

डॉक्टर आत्मिक ज्ञानाचे ।
भक्त प्रभू आर्त जनांचे तात आपण सात्रे ।। धृ ।।

इक्षुसम अंतरी गोडी ।
अपुल्या म्हणती एकमतें जन, परि उपमा थोडी ।। १ ।।

फेडुनि पांग अनाथातें ।
सत्य प्रकाशि किती आणिलें, कोण गणिल त्यातें ।। २ ।।

अनुपम कार्ये बहु केलीं ।
स्वशक्ति, युक्ति, स्फूर्ति त्यामधीं खर्चुनियां सगळीं ।। ३ ।।

रमवी दिनचर्या अपुली ।
पूज्य बुद्धि मनीं उमजुनि म्हणते हाच खरा वाली ।। ४ ।।

बँकच निर्मल सल्ल्याची ।
देई सेवा व्याज, जियेला गरज न ठेवीची ।। ५ ।।

कलानिधि म्हणति दुबळ्यांचा ।
दीपच आपण न हे परंतु पुंजच विमलांचा ।। ६ ।।

साधुवृत्ति, मुखावरती।
प्राप्तस्थिति जी आज आम्हांला हीच तिची प्रचिती ॥ ७॥

हे ठावे वसति हृदया।
आतां अपुला वियोग म्हणतां विनवितो सदया॥ ८॥

बळ दीर्घायु दे यांना।
कृपा छत्र शिरीं धरुनी अर्पितो पद्य नव्हे स्वमना॥ ९॥

## वसंततिलका

माया मनोमय करी महिलांवरी जी।
तोरा कधीं न मिरवी इतरांवरी जी।
श्री ख्रिस्त हर्षित करी अतुल्या कृतींनीं।
मेवाच त्या जननिची बहुगोड वाणी॥ १०॥

रीक्तांस युक्त करिते प्रभुचीच शक्ति।
बाष्पी अगम्य भरली असतेच शक्ति।
ईशें दिली खचित ही तशि माउलिला।
सोसाव्या बिकटशा शरीरव्यथेला॥ ११॥

टीप–हें वरील काव्य श्री. सु. म्या. आढाव, सेवानिवृत्त मिशन शाळा इन्स्पेक्टर यांनीं वडाळा येथें डॉ. व मिसेस फेअरबँक यांस सेवानिवृत्त समयीं दि. १।१।१९३७ इ. रोजीं समर्पित केलें.

## फेअरबँक हा खरा मिशनरी

हा धार्मिक हा सात्विक मिशनरी थोर।
हास्य मुख झळके फार ॥ धृ ॥

हा नाथ असा अनाथाचा झाला।
तयासाठीं झिजवी तनूला ॥
किती प्रेम, दया अंतर्यामी भरली।
जणू ख्रिस्त जीवनी रमली ॥
हा ज्ञानी खरा, वकील खरा वडाळ्याचा।
शेतकरी भिल्ल, बेरडांचा ॥

( चाल बदलून ) हा बंगला जणूं कचेरी ।
कब्जा तोडी बहूं चातुरी ।
समेट करी झडकरी ।
हा भक्त खरा खराखरा मिशनरी ।
गरीबांचा हा कैवारी ॥ १ ॥

हा सद्बोध करी शास्त्रामधुनी भरी ।
'विधायक विधान का वरी'।
मी स्मरतों आजवरी ।

( चाल बदलून ) हा बोध अमृत भेला ।
कित्येकांनीं हा सेविला ।
तयां हृदयीं हा ठसलेला ।
हा वक्ता खरा आत्म्यानें भरलेला ।
नांव शोभें "डॉक्टर" त्याला ॥ २ ॥

फेअरबँक हें धार्मिकतेची बँक ।
अंधारांतील होती प्रकाशक ।
फेअरबँक हे ज्ञानी धार्मिक भक्त ।
शाळा बघतां येई प्रत्ययास ।
अंकगणित हें भूगोल, इतिहास, भाषा ।
परीक्षा घेई मराठी भाषा ।

( चाल बदलून ) पाटलास पत्र मोडींत ।
शिक्षकास मराठींत ।
मामलेदारास इंग्रजींत ।
हा ज्ञानी, किती धार्मिक होता भक्त ।
मिशनऱ्यांत श्रेष्ठ मौक्तिक ॥ ३ ॥

प्र. ग. पोळ, हेड्मास्तर,
मिशनस्कूल, शुभर

दि. ४-१-१९५८

## मिसेस एडवर्ड फेअरबँक यांचा मृत्यु

फेअरबँक मडमसाहेब २०–७–१९५१ इ. शुक्रवार रोजीं दुपारीं १२–३० ते १ च्या दरम्यान आघात ( Stroke ) झाल्यामुळें तावडतोब बेशुद्ध झाल्या. डॉक्टरच्या मसलतीवरून त्यांना न्यूटन दवाखान्यांत नेल्यावर ३२ तास त्या शुद्धीवर आल्या नाहींत. त्या २१ तारखेस शनिवारीं संध्याकाळीं ८–४५ ला प्रभूमध्यें शांतपणें निजल्या. सहकारिणीच्या वियोगामुळें डॉ. इ. फेअरबँक यांची फार मोठी हानि झाली आहे. तरी हें दुखः ते धैर्यानें सहन करीत आहेत. डॉ. व मिसेस फेअरबँक यांचा विवाह १८९३ सालीं झाला. मृत्युसमयीं मिसेस फेअरबँक यांचें वय ८० वर्षांचें होतें. न्युटन स्मशानभूमींत त्यांना पुरण्यांत आलें.

## स्मारक उपासना

मिसेस फेअरबँक यांच्यासाठीं अबर्नडेल मिशनरी होममध्यें २५–७–१९५१ बुधवार रोजीं स्मारक उपासना करण्यांत आली. ती रे. डॉ. ए. एच्. क्लार्क यांनीं चालविली. त्यासमयीं त्यांचे नातलग, नातवंडे आणि इतर मंडळी जमली होती.

रे. डॉ. क्लार्कसाहेब म्हणाले, आपण ह्या ठिकाणीं मेरी फेअरबँक यांनीं आपल्यावर केलेल्या कांहीं प्रीतीच्या गोष्टींची आठवण करणार आहोत. वडाळ्यांत त्यांचें घर उच्च प्रतीचें होते. या घराचें जीवन असें होते कीं, जे जे येथें आले त्यांना तेथें मित्रपणा दिसून आला. लोक हा माझा छंद, नाद आणि आवडीचा विषय आहे, असें त्या नेहमी म्हणत असत.

मिसेस क्लार्कला व मला भारताविषयीं जी माहिती मिळाली ती वडाळ्यांतील फेअरबँकसाहेबांच्या घरीं. आणि आमच्या मागून आलेल्या मिशनरींना त्याच घरीं आमच्या सारखाच अनुभव मिळाला.

१९३८ सालीं वडीलसाहेब आणि मडमसाहेब सेवानिवृत्त झाल्यावर ते नॉर्थफिल्ड या ठिकाणीं आपल्या नातवंडाबरोबर राहिले. त्यांची आनंदीवृत्ति शेवटपर्यंत टिकली. आतां त्या शारीरिक दुःखांतून मुक्त होऊन देवाघरीं गेल्या आहेत. म्हणून त्यांची उपकारस्तुति करावी.

## डॉ. इ. फेअरबँकसाहेबांचें पत्र नं. १

प्रिय ख्रिस्ती भावांनो व बहिणींनो,

तुम्हां सर्व लहानथोरांस फेअरबँकसाहेबाचा फार प्रीतीचा सलाम. वि. वि. कळावें कीं, तुमचें ता. ३–८–१९५१ चें दुःख प्रदर्शित पत्र परवांच मिळालें. ते वाचून विशेष प्रकारची शांति आणि समाधान प्राप्त झालें.

वडाळें व वडाळें प्रांत आमच्या जिण्याचें व जिवाचें ठिकाण आहे. वाडीमध्यें व गांवामध्यें मडमसाहेबांचें प्रेम लोकांवर फारच होतें. फेरीवर असतांना हिंदु व ख्रिस्ती बायांच्या भेटी त्या सतत घ्यायच्या आणि त्यांच्या घरच्या गोष्टींविषयीं, त्यांच्या मुलांबाळांच्या पालनपोषणाविषयीं, पवित्रशास्त्राचें उत्तम शिक्षण व प्रार्थना ह्याविषयीं, पण सर्वांत प्रभुख्रिस्ताच्या प्रीतीविषयीं सांगणें हा क्रम त्यांनीं कधींहि सोडला नाहीं. हीच गोष्ट

त्यांनीं वडाळ्यामध्यें केली. भारतांत सेवा केल्यावर वयामुळें व आजारामुळें आम्हाला आपले प्रियकर लोक सोडावें लागले. मडमसाहेब आतां देवाच्या घरीं आहेत अशी माझी खात्री आहे.

देव करो आणि तुम्हांला मोठा आशीर्वाद देवो.

ता. २०-८-५१ — आपला मित्र

यु. एस. ए. — एडवर्ड फेअरबँक

## पत्र नं. २

१३८ हॅक्कॉक स्ट्रीट
अबर्नडेल ६६ मास
८ सप्टें. १९५५

प्रिय डेविडराव,

तुम्ही पाठविलेलें पत्र मला १६ तारखेस मिळालें. तुम्हांला एक पुस्तक पाठविण्याचें मी ठरविले होते, तेव्हां माझ्या मौल्यवान् पुस्तकांपैकीं "Rediscovery of Prayer" "प्रार्थनेचें संशोधन" हें मी तुम्हांला बुक-पोस्टानें पाठवून दिलें आहे. तें तुम्हांला व्यक्तिशः आणि मंडळीच्या कामांत सहाय्यक, बोधपर आणि स्फूर्तिदायक होईल असें मला वाटतें.

गेल्या पत्रांत तुम्ही मला तुमच्या मंडळीच्या कामासंबंधीं बरीच माहिती दिली ती वाचून मला फार आनंद झाला. वडाळा मंडळी ही सजीव आणि कार्यकारी असावी अशी माझी इच्छा आहे. तिच्यासाठीं मी प्रार्थना करितों.

अमेरिकन मिशनरींनीं चालविलेल्या कामाचें पुढारीपण, सर्वस्वी त्यांच्याचकडे नव्हे, तर अमे. मराठी मिशनाच्या मंडळ्या आपणाकडे घेणार आहेत असें अलिकडे मला बरेचसें ऐकायला मिळतें. अशाप्रकारें पुढें पाऊल पडणें मोठी गोष्ट आहे. माझी खात्री आहे कीं, ही बाब केवळ अधिकार अगर पैसा घेण्याची नसून नम्रपणानें आणि खऱ्या मनानें येशूख्रिस्त जो आमचा स्वामी त्याची सेवा करायाची आहे.

कांहीं दिवसांपूर्वी मी आपले कागदपत्र चाळीत होतों, तेव्हां एका ठिकाणीं मला एक कागदाचा तुकडा सांपडला. त्यावरील मजकूर असा होता.—**समर्पण, वडाळा-चर्च, ७ आक्टो. १९०३.** असें लिहिण्याचें कारण हें कीं, आपल्या या सुंदर उपासनामंदिराच्या कोनशिलावर हे शब्द लिहावेत. ही गोष्ट मागेंच करावयास पाहिजे होती ती तशीच राहून गेली. अशा प्रकारचे कोरीव लेख पुष्कळ वर्षांनंतर अनेकदां फार महत्वाचे वाटतात.

अलिकडे "**मृतसमुद्रांतील कागदांच्या गुंडाळ्यांचा**" शोध लागला हें ऐकून माझें फार समाधान झालें. ह्या गुंडाळ्या मृतसमुद्राच्या वरील गुहेंत सांपडल्या. त्यांत जुन्या करारांतील भाग हिब्रू भाषेमध्यें आहेत. ते ख्रिस्तीशकापूर्वी शेंदोनशें वर्षे लिहिले गेले. यशायाच्या भविष्याप्रमाणें मूळ प्रती म्हणून त्या मौल्यवान् आहेत.

वडाळा मंडळी व इतर मित्रांस सलाम.

आपला
एडवर्ड फेअरबँक

अ. प्र. मंडळी ग्रंथालय 684

## पत्र नं. ३

११ सप्टें. १९५७

प्रिय डेविडराव,

"एस्तरराणीची कथा" हें पुस्तक तुम्ही मला पाठविलें हें फार चांगलें केलें. ही इस्टरची भेट म्हणून आहे हें माझ्या लक्षांत आलें. मला तें पाहून आनंद वाटला. पवित्र-शास्त्रांतील गोष्ट व्यावहारिक आणि उपयोगी करण्यासाठीं तुम्ही चांगल्या पद्धतीचा अवलंब केला. तुम्ही ही गोष्ट प्रथम तुमच्या मंडळींतील स्त्रियांच्या सभेंत वाचून दाखविली हें चांगलें केलें. ही गोष्ट तुम्ही चांगल्याप्रकारें लिहिली आहे. ह्या सेवेबद्दल मी तुमचें अभिनंदन करितों.

चर्चमिशन एकीकरण होत आहे ही मोठी गोष्ट आहे. मिशनरी आणि मंडळ्या यांच्यापुढें पुष्कळ अडचणी आहेत. हा मोठा प्रश्न आहे. जसे अधिकार हातांत घेण्यास मनुष्याला अभिमान वाटतो तसे अधिकार दुसऱ्याकडे जातात तेव्हां मनुष्याला कमीपणा वाटतो. तर सेवा करण्यासाठीं दोघांनांहि विशेष महत्वाचे प्रसंग आहेत.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे खर्चाची व्यवस्था. देवाच्या पैशांचा उपयोग स्वतः-साठीं नव्हे, तर मंडळीसाठीं करणें व तो काळजीपूर्वक करणें ही जबाबदारीची गोष्ट आहे.

हें पत्र लिहिण्यास मी हातीं घेतले तेव्हां मी जें लिहिलें तें लिहिण्याचा माझा प्रथम हेतु नव्हता; परंतु देवाच्या कामाविषयीं विचार करीत असतां तसें लिहिण्याची प्रेरणा झाली. मि. अनंतराव ससाणे यांस तुम्ही अर्थात्‌च चांगले ओळखीत आहां. त्यांनीं बॉस्टन विश्वविद्यालयांतील ईश्वरीविद्येच्या पाठशाळेंत चांगला अभ्यास केला आहे. डॅन्व्हरचर्च-मध्यें चांगले काम केलें आहे. डॅन्व्हरचर्चनें मडमसाहेबांना आणि मला वडाळ्याच्या कामासाठीं पैसा पुरविला आहे. तसेंच आमचा मुलगा व सूनबाई यांनांहि त्याच चर्चनें मदत केली आहे आणि करीत आहे.

वडाळें मंडळींतील सर्व लोकांस, गांवांतील आणि प्रांताच्या खेड्यापाड्यांतील लोकांस माझा फार सलाम सांगा.

वडाळें हें आमच्या कितीतरी आवडीचें ठिकाण !

आपला विश्वासू,
एडवर्ड फेअरबँक

रे. जे. एल्. मोल्टनसाहेब वडाळा-मिशनचर्चचे मॉडरेटर असतांना प्रस्तुत लेखकास मंडळीचें पाळकपण करण्यास पाचारण झालें. १९४३ पासून १९५९ पर्यंत एकूण १६ वर्षें ही सेवा करण्याची संधि देवबापानें दिली म्हणून त्याची स्तुति करितों. याच अवधित वडाळा-मिशनचर्चला "फेअरबँक मेमोरियल चर्च" हें नांव देण्यांत आलें आणि डॉ. इ. फेअरबँकसाहेबांच्या पत्राला उत्तर म्हणून उपासनामंदिराच्या कोनशिलावर—

समर्पण

फेअरबँक मेमोरियल चर्च

७ आक्टोबर १९०३

ही अक्षरें कोरण्यांत आली. ही गोष्ट वडील फेअरबँकसाहेबांना कळविली. त्यांची इच्छा पूर्ण झाली म्हणून त्यांना आनंद वाटला. वडील साहेबांनीं कळविल्याप्रमाणें "**प्रार्थनेचें संशोधन**" हें पुस्तक मला मिळालें तें पाहून मला फार आनंद वाटला. त्यांचा उपयोग मला व इतरांना झाला. त्याबद्दल वडील फेअरबँकसाहेबांना पत्र पाठविलें. त्यांत मी त्यांचे आभार मानिले.

तुमचें ५ नोव्हें. १९५७ चें पत्र मिळालें, असें डॉ. फेअरबँकसाहेब मला लिहितात आणि म्हणतात कीं, तुम्ही माझें संक्षिप्त चरित्र लिहूं इच्छितां म्हणून मला आनंद वाटतो. पण तें लिहितांना माझ्याविषयीं दुसऱ्यांकडून माहिती मिळाली तर त्यांत माझी स्तुति अगर गौरव नसावें. या गोष्टीकडे लक्ष द्यावें. काल मला तुमचें "**रूथचें तारण**" हें पुस्तक मिळालें. हेंहि महत्वाचें, उपयुक्त आणि बोधपर आहे. म्हणून मला आनंद वाटतो. तसेंच माझें चरित्र लिहिलें जावें अशी अपेक्षा बाळगितों.

आपला,

एडवर्ड फेअरबँक

## चर्चमिशन एकीकरणाचें दोन प्रसंग– फेब्रुवारी ११, १२, १९६०

एक प्रसंग वडाळा–मिशन मुक्कामीं फेअरबँक मेमोरियल चर्चमध्यें आणि दुसरा प्रसंग डॉ. भा. पां. हिवाळे, अहमदनगर चर्च कौन्सिलचे मॉडरेटर असतांना अहमदनगर ह्यूम मेमोरियल चर्चमध्यें मोठ्या थाटानें साजरा झाला. दोन्ही प्रसंगीं बरेंच लोक उपस्थित होते. कोल्हापूर चर्चमिशन एकीकरणांतील पुढारी रे. आर्. एस्. भंडारी, बी. ए. बी. डी. आणि नागपूर चर्च कौन्सिलांतील पुढारी, नागपूर मंडळीचे आचार्य आणि यु. सी. एन्. आय. जनरल असेंब्लीचे हंगामी मॉडरेटर रे. शा. तु. नवगिरी आणि अमे. मिशन बोर्डाचे सेक्रेटरी रेव्ह. टेल्फर मुकसाहेब पाहुणे भाषणकार म्हणून हजर होते. प्रसंग चांगले झाले. हस्तांदोलन आणि आनंदीआनंद झाला.

तेव्हांपासून चर्च आणि मिशननें एकत्रित अंगावर घेतलेलें शुभवर्तमानाचें काम चांगल्याप्रकारें चालविलें असून शैक्षणिक आणि वैद्यकीय जबाबदारीही घेण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे हें नमूद करण्यांत येते.

चर्चमिशन एकीकरणाविषयीं डॉ. फेअरबँकसाहेब विचार आणि प्रार्थना करीत होते. तें आतां झालें आहे आणि काम चांगले होत आहे ह्याविषयीं डॉ. फेअरबँक–साहेबांस कळविलें तेव्हां त्यांना फार समाधान वाटलें.

# भाग ४ था

## तेव्हांचें व आतांचें वडाळा–मिशन

त्यावेळचे व सध्याचे कामगार—आचार्य रे. शे गायकवाड, रे. स. राहाटोर, रे. कृ. हिवाळे, रे. ल. साळवी, रे. बा. चांदेकर, रे. जा. गोर्डे, रे. ह. गायकवाड. रे. यो. हिवाळे, रे. तु. देठे, रे. या. साळवे, रे. प्र. गोर्डे, रे. भा. अनकाईपगार, रे. स. गरुड, रे. जी.राहाटोर रे. सु. देठे, रे. जी. गायकवाड, रे. सु. डोंगरे, रे. समुद्रे, रे. ए. लोखंडे, रे. दा. पटेकर, रे. वि. कृ. गायकवाड, रे. शं. गोर्डे, रे. जी. हिवाळे, रे. या. हिवाळे, रे. जी. चांदेकर, रे. वा. खरात, रे. भा. कसोटे, रे. प्र. चांदेकर, रे. प्र. तेलोरे, रे. सु. जेम्स, रे. ज. गाय–कवाड वगैरे.

सुवार्तिक–श्री. आ. पटेकर, श्री. स. ओहोळ, श्री. ए. गायकवाड, श्री. एन्. शेरे, श्री. दा. खरात, श्री. या.रणनवरे, श्री. वा. ससाणे, श्री. बा. चंदनशीव, श्री.ना.गायकवाड.

शिक्षक व शिक्षिका–श्री. ब. गिरी, श्री. ग. बंदसोडे, श्री. ग. पोळ, श्री. आ. हिवाळे, श्री. ले. चांदेकर, श्री. ए. साळवे, श्री. ग. साळवे, श्री. भि. चांदेकर श्री. आ. चांदेकर, श्री. लोंढे, श्री. चं. डोंगरे, श्री. अ. ससाणे, श्री. वैरागर, श्री. के. जाधव, श्री. म. जाधव, श्री. ना. हिवाळे, श्री. शां. साळवी, श्री. शं. मिसाळ, श्री. के. ठोकळ, श्री. य. सगळगिळे, श्री. मा. डोंगरे, श्री. सा. सोनकांबळे, श्री. स. कांबळे, श्री. आ. गायकवाड, श्री. शा. नव–गिरे, श्री. एन्. हर्षे, श्री. भि. साळवे, श्री. जी. चांदेकर, श्री. गं. गोर्डे, श्री. ग्या. गायक–वाड, श्री. हुसेनखान कमालखान, श्री. जी. साळवे, श्री. श. साळवे, श्री. शां. चक्रनारायण, श्री. दौ. बनकर, श्री. सो. ठोकळ, श्री. स. हिवाळे, श्री. पी. हिवाळे, पठारे, पात्तारे व देठे इ.

श्रीमती गो. ओणावळे, लिलाबाई भारशंकर, सौ. शां. खरात, कु. शा. वाघमारे, श्रीमती चं. आढाव, मिस्. डोंगरे, मिस्. कनोजिया, मिस्. ना. गायकवाड, सौ. ना. मकासरे सौ. मं. तांबे, सौ. लि. पवार, मिस्. य. सोनकांबळे.

बायबल वुइमेन–सौ. स. गायकवाड, सौ. द्रौ. गोर्डे, सौ. मा. देठे, सौ. द. गोर्डे, व श्रीमती य. बंदसोडे.

मेट्रन व हाऊस फादर्स–सौ. ता. वाघचौरे, श्री. ब. गायकवाड, श्री. ना. पाटोळे, कमालखान पठाण, सौ. सु. चक्रनारायण, श्री. बा. खरात वगैरे.

सुपरवायझर–श्री. दा. त्रिभुवन, श्री. र. मो. ओणावळे, श्री. सु. आढाव

डॉक्टर्स, नर्सेस व इतर कामदार–डॉ. उ. हिवाळे, डॉ. बी. ओहोळ, डॉ. बी. चक्र–नारायण, डॉ. व मिसेस् आब्राहाम, डॉ. लोंढे, डॉ. एम्. गायकवाड, डॉ. मोहन, डॉ. य. गायकवाड, डॉ. कोर्चागिना, डॉ. एल्. हिवाळे, डॉ. य. साळवे, डॉ. कोराटे, डॉ. व मिसेस् शेळके डॉ. व मिसेस् देवधर. डॉ. व मिसेस् एच्. कुक, मि. व मिसेस ससाणे, मि. व मिसेस

गायकवाड, श्री. गायकवाड, मि. व मिसेस् चोपडे, मि. व मिसेस् नरवडे, मि. ओणावळे, मि. शिंदे, मि. खरात, मि. शिंदे, श्री. शिराळकर, श्री. एन्. गायकवाड, श्रीमती आ. त्रिभुवन, मि. व मिसेस् बर्फे. भालेराव, वाघचौरे, मकासरे, वाघमारे, ज. नवगिरी, फ. कळसकर, मि. व मिसेस् ध. काळे, पवार, कसबे, शां. गायकवाड, ग. गायकवाड, प्र. चंदनशीव मोहिते, पटेकर, शिंदे, श्रीमती सु. पंडित, सौ. आर. केकाळ, मिस्. सु. मिसाळ, मेस्टर एच्. घोडके.

**बेबी वेल्फेअर केंद्र**–मिस् पाटोळे, सौ. आर. बोर्डे, मिसेस् पी. डी. पटेकर, सौ. मं. गायकवाड, सौ. शिराळकर, सौ. सु. ओणावळे.

**विकास केंद्र, शेती आणि इतर कामदार**–श्री. विजय गायकवाड, श्री. व. शिंदे, श्री. मो. ग. कांबळे, श्री. स. कांबळे, श्री. रा. ससाणे, श्री. शिरसाठ, श्री. गडकर, श्री. ग. गायकवाड, पंडु गायकवाड, चं. ओणावळे, मिसेस् ओणावळे, वाघमारे, किसनराव खरात, भास्कर मंडलिक, म. गायकवाड, श्री. दौ. मिसाळ, श्री. वा. शिंदे, सौ. आर. ओणावळे, प्रे. ओणावळे, श्री. चं. ओणावळे. सौ. का. मंडलिक, गि. वाघमारे, श्री. शिंदे, पौलस आढाव, या. गायकवाड, श. गायकवाड, मा. गायकवाड, अर्जुन गायकवाड वगैरे.

डॉ. व मिसेस् आब्राहाम यांनीं फे. जे. फें. मेमोरियल हॉस्पिटल मध्यें आणि वडाळें प्रांतांतील खेड्यापाड्यांत उत्तमप्रकारें काम केलें. स्वतंत्ररीतीनें ते आतां श्रीरामपूर येथें वैद्यकीय सेवा करीत आहेत. तरी तेथें लोक त्यांना 'वडाळकर' डॉक्टर या नांवानेंच संबोधितात.

## कांहीं मिशनरींच्या विशेष कामाचा उल्लेख

१ रे. इ. फेल्ट साहेबांनीं मराठी भाषा लवकर अवगत केली. त्यांनीं मराठी (शेतकरी) मुलांच्या बोर्डींगची व्यवस्था मि. व मिसेस आर. ओणावळे यांच्या साह्यानें उत्तम ठेविली. फेल्टसाहेब लेखक होते. त्यांनीं योना आणि यिर्मया या दोन संदेष्ट्यांची पुस्तकें लिहून ख्रिस्ती वाङ्मयांत भर टाकली. रे. फेल्टसाहेब हे आतां देवाघरीं आहेत.

२ रे. आर. डब्ल्यू. फेअरबँक– खेड्यापाड्यांतील लोकांची आर्थिक बाब सुधारण्यासाठीं जोडधंदा म्हणून रे. आर. डब्ल्यू. फेअरबँकसाहेबांनीं कित्येक घरीं व्हाइटलेग हॉर्न जातीची कोंबड्याची नरमादी पुरविली. अंड्यांच्या विक्रीची योजना केली. खुराड्यासाठीं तार (जाळी) दिली आणि चांगल्या जातीची बकरी दिली. "शेळी ही गरीबाची गाय आहे," असें सांगली मिशन औद्योगिक खात्याचे चालक डॉ. जे. एल्. गोहीन यांचें म्हणणें असे. रे. व मिसेस आर. डब्ल्यू. फेअरबँक यांनीं सोलापूर शहरांत व प्रांतांत बरींच वर्षें सेवा केली. गेल्या वर्षीं ते सेवानिवृत्त झाले. पण अमेरिकेला जाण्यापूर्वीं त्यांनीं उस्मानाबाद प्रांताची जबाबदारी अहमदनगर चर्च कौन्सिलच्या अधिकारान्वयें रे. डी. डी. पटेकर, बी. ए. बी. डी. यांच्याकडे थोर मनानें प्रांताचार्य म्हणून सोपविली आहे.

३ रे. जे. एल्. मोल्टन– सबंध नगर जिल्ह्यांत आणि महाराष्ट्रांत सावरीची (कांटेरी निवडुंग) फार वाढ झाली होती. त्यांत पुष्कळ जीवजिवाणु राहात. कित्ये–

कांना त्यांत लपून चोऱ्या करण्यास फावे. या साबरीचे निर्मूलन करणाऱ्या कोचनील किड्यांचा ( Insects ) दक्षिण भारतांत शोध लागला. मोल्टनसाहेबांनीं हे किडे आणून राहुरी, वडाळा, नगर, सांगली वगैरे भागांत त्यांचा प्रसार जोरानें केला. त्या किड्यांनीं मुळासकट साबर खाऊन टाकली. त्यामुळें साबर पूर्णपणें नाहींशी झाली आहे. गोरगरीब लोक म्हणत असत कीं, साहेबांनीं आमच्या पोटावर मारिलें. दुष्काळाच्या दिवसांत आणि इतर वेळीं यांच्या फळावर ( बोंडावर ) आम्ही पोट भरीत असूं. पण साहेबांनीं केलेलें साबरीचें उच्चाटन ही स्तुत्य गोष्ट होय. तीमुळें विनाकारण व्यापलेली कितीतरी जागा मोकळी झाली आहे. सर्वांचा फार फायदा झाला.

४ रे. आर. एच्. गायकवाड– १९४६ सालीं मुळामुठा या नद्यांना आलेल्या महापुरामुळें बरींच गांवची घरें जमिनदोस्त झालीं. मालमत्तेची अतोनात नुकसान झाली. पूरग्रस्त लोक थंडींत व ओलसर जागेंत दिवस कंठू लागले. रे. गायकवाडसाहेबांनीं प्रत्यक्ष कांहीं ठिकाणांना भेटी देऊन सहानुभूति दाखविली आणि परदेशाहून आलेल्या मदतींतून आणि येथें ताबडतोब जमविलेल्या निधींतून पाचेगांव, करजगांव, पुणदगांव, नेवासे, मंगळापूर, गळलिंब वगैरे गांवांतील पूरग्रस्तांना धान्य, कपडे, पैसे, लांकडे आणि पत्रें देऊन निवाऱ्यास बसविले. त्यांना आनंद वाटला व देवबापाची स्तुति केली.

रे. शा. तु. नवगिरी हे नागपूर १८४० चर्चवर आचार्य असून यु. सी. एन्. आय्. जनरल असेंब्लीच्या हंगामी मॉडरेटर या उच्च पदास चढले.

श्री. के. स. ठोकळ, बी. ए. एस्. टी. सी. हे औरंगाबाद येथें मिशन हायस्कूलवर हेड्मास्तर आहेत.

श्रीमती इं. दा. त्रिभुवन, बी. ए. बी. टी. ह्या अहमदनगर सेंटमोनिका ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉल आहेत.

रे. र. आ. हिवाळे, बी. ए. बी. टी. बी. डी., एम्. टी. एच्. ( प्रिन्स्टन ) हे नागपुरास व्होकेशनल हायस्कूलचे हेड्मास्तर आहेत.

श्री. दि. प्र. वाघचौरे, बी. ए. बी. टी. हे मुंबईस विल्सन हायस्कूलवर हेड्मास्तर म्हणून काम करीत आहेत.

ही वर नमूद केलेली मंडळी वडाळ्याच्या शाळेंतील मुलां-मुलींपैकीं आहेत. याविषयीं ऐकून डॉ. फेअरबँकसाहेबांस आनंद व भूषण वाटतें.

## आतांचें वडाळा-मिशन आणि काम

अलिकडे वडाळें आणि वडाळें प्रांताच्या कामांत बरीच वाढ झाली आहे. आरंभीं शेतीकडे डॉ. इ. फेअरबँक, रे. आर. डब्ल्यू. फेअरबँक आणि मि. पी. सी. बालाराम यांनीं लक्ष

दिलें. नंतर रे. व मिसेस जी. एच्. टोल यांनीं मॅनेजर म्हणून काम पाहिलें. त्यांच्याबरोबर मि. जी. डी. स्मिथ, बी. एस्‌सी. बी. एजी., श्री. एस्. जे. पालवे, एम्. एस्. सी. बी. ए. जी. व श्री. आय. व्ही. हल्ली, ( अलाहाबाद अॅग्रिकल्चरल ट्रेंड ) यांनींहि देखरेख केली आहे. त्यांच्या श्रमामुळें व कुशलतेमुळें बरीच सुधारणा झाली आहे. बरा़च खर्च करून बोअरिंग केल्यामुळें ( लोखंडी यंत्रानें खणल्यामुळें ) विहिरीला पाण्याचा मोठा नळ लागला आहे. त्यामुळें शेतीला पिकासाठीं भरपूर पाणी मिळतें.

शेतांत तळघर असलेला मोठा बंगला रे. टोलसाहेबांच्या वडिलांचें स्मारक म्हणून बांधला आहे. अलाहाबाद शेतकी कॉलेजमधून शिक्षण घेऊन आलेले श्री. एस्. टी. दोंदे आतां ते काम पाहात आहेत. अमेरिकेहून रे. टोलसाहेबांच्या उत्तेजनानें एक तरुण गृहस्थ कांहीं दिवसासाठीं शेतीवर स्वयंसेवक म्हणून काम करण्यास आले होते. त्यांच्याकडून शेतीवर काम करणाऱ्यास बरेंच साह्य आणि उत्तेजन मिळालें आहे. बंडिंग करून घेण्यांत ( शेताला बांध घालण्यांत ) वडाळा-मिशन फार्मनें प्रथम पाऊल टाकलें.

सध्यां रे. व मिसेस जी. एच्. टोल आणि श्री. एस्. जे. पालवे हे १९५४ पासून विकास योजनेचें काम पाहात आहेत. म्हणून खेडोपाडी शेतकरी लोकांच्या अनेक गरजा भागविल्या जातात आणि यांत्रिक साधनांच्याद्वारें सहाय्य मिळत आहे. या विकास योजनेला अमेरिकेंतील " वर्ल्ड नेबर्स " या संस्थेचा आश्रय आहे.

वडाळा-मिशन येथें " व्होकेशनलस्कूल " ( धंदेशिक्षणाची शाळा ) असून मिडलस्कूलच्या ऐवजीं आतां हायस्कूल झालें आहे. व्होकेशनलस्कूलवर वर्ध्याहून शिक्षण घेऊन आलेले तज्ञ श्री. डी. जी. दुसिंग हेड्मास्तर म्हणून काम पाहात आहेत आणि हायस्कूलवर मिसेस स्वार्ट ह्या फर्लोवर गेल्यामुळें श्री. आर. एस्. गायकवाड बी. ए. बी. टी. यांना हेड्मास्तर म्हणून घेतलें आहे. दोन्ही शाळांवर सुशिक्षितांचा भरणा आहे.

डॉ. व मिसेस कुक् व डॉ. व मिसेस देवधर यांनीं आपल्या कर्तबगारीनें दवाखाना व इतर इमारती वाढविल्या आहेत. " **बाबावाडी** " म्हणून एक केंद्र लहान मुलांसाठीं उघडलेलें आहे. टी. बी. ( क्षयरोग्यासाठीं ) वॉर्ड बांधलें आहे. वडाळ्यापासून दोन मैलावर पूर्वेस मिशनाची शेती आहे. तेथें कुष्ट रुग्णालय होणार आहे. डॉ. चेरियन हे सध्यां कुष्टरोग्यांच्या शुश्रुषेकडे लक्ष देतात. दवाखान्यांत क्ष-किरण यंत्र आहे. शस्त्रक्रिया येथेंच होतात. विजेचें यंत्र आणिल्यामुळें दवाखाना, बंगलें आणि चर्च यांना प्रकाश मिळतो.

डॉ. व मिसेस कुक् हे आरोग्य विभागाचे मुख्य चालक असून ही महत्वाची कामगिरी त्यांनीं १९५६ सालीं हातीं घेतली. कुकाणें, सलाबतपूर, चिचोरे, घोडेगांव आणि इतर बाजारच्या गांवीं दर सप्तकांत भेटी देतात व रोग्यांची सेवा करितात. दवाखान्याच्या आणि शाळेच्या आवारांत राष्ट्रीय झेंड्यासाठीं उत्तम स्तंभ उभारले आहेत. रे. डॉ. कुक् हे फे. मे. चर्चचे मॉडरेटर आहेत. त्या चर्चला आचार्य मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

चर्चच्या आवारांत उत्तम बाग केली आहे. आचार्यांच्या घराची बरीच सुधारणा केली आहे. ह्या सर्व गोष्टींचे श्रेय डॉ. देवधर आणि त्यांची सहकारी मंडळी यांना देण्यांत येते. त्यांनीं सुट्टीच्या दिवसांत अहर्निश झटून पावसांत आणि ऊनवाऱ्यांत खेडोपाडीं फिरून व रोग्यांस औषधोपचार करून चर्चच्या आणि आचार्यांच्या घरासाठीं पैसे मिळविले आहेत.

डॉ. देवधर हे पुढील उच्च वैद्यकीय शिक्षणासाठीं मुंबईस गेले. नंतर अमेरिकेस जाणार आहेत. डॉ. सात्राळकर यांनीं कांहीं दिवस दवाखान्यांत काम केलें आहे. ते आतां बंगलोर येथील ईश्वरीविद्येच्या शिक्षणासाठीं गेले आहेत. त्यांच्या ठिकाणीं डॉ. व मिसेस आरोळे यांना घेतले आहे. ते एम्. बी. बी. एस्. परीक्षा पहिल्या श्रेणींत पास झाले आहेत.

श्री. शंकरराव मिसाळ हे हिशेबाचे काम करण्यांत कर्तबगार आणि तरबेज आहेत. मंडळीचे आणि चर्च कौन्सिलचे खजिनदार आणि अमेरिकन मराठी मिशनच्या जनरल कौन्सिलच्या अधिकारान्वयें त्यांनीं सर्व क्षेत्रांत हिशेब तपासणीस म्हणून काम केलें आहे.

पुणें ईश्वरविज्ञान पाठशाळेंत शिक्षण पावलेले रे. सु. जेम्स मुलांच्या बोर्डींगला हाऊस फादर लाभले आहेत म्हणून पवित्रशास्त्र शिक्षणांत मुलांची दिवसेंदिवस प्रगति दिसून येत आहे. ते प्रांतांतील श. शाळेवर देखरेख करून त्यांच्या उन्नतिप्रित्यर्थ झटतात.

रे. व मिसेस स्वार्ट हे शाळांवर देखरेख करून सुवार्तेचें काम आस्थेनें करीत आले आहेत. हे शिस्तीचे भोक्ते आहेत. काम वेळेवर झालेच पाहिजे आणि दानधर्म वाढत गेला पाहिजे, या गोष्टीवर ते विशेष जोर देतात. स्त्रीपुरुषांच्या भजनमंडळ्या आणि स्त्रियांच्या सभा वाढत्या प्रमाणावर आहेत. प्रांतांत ठिकठिकाणीं सर्व संस्थांचे संघटितप्रसंग (शिबीरें) भरविली जातात. तसेंच प्रांतिक मेळा दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणीं लाभदायक होतो. मधूनमधून धार्मिक आणि आरोग्यविषयक, उदा. "राजांचा राजा" क्षयरोग वगैरे चलत्-चित्रपट दाखविले जातात.

प्रांतांत कांहीं ठिकाणीं मंडळ्यांची स्थापना होऊन उपासनामंदिरेहि श्रमदानानें, वर्गण्या मिळवून आणि मिशनाच्या मदतीनें बांधली आहेत. आचार्य, सुवार्तिक, शिक्षकवर्ग, शेतकी आणि वैद्यकीय खात्यांतील कामदार आपापली कामें नियमानें करतात. गांवकरी आणि ख्रिस्तीसमाज यांच्यांत सहकार्य दिसून येतें. कामदार नसलेल्या ठिकाणीं कारभारी आणि स्वयंसेवक उपासना चालवितात. फेअरबँक मेमोरियल चर्चनें उपासनेसाठीं आणि शुभवर्तमानासाठीं आसपासची गावें घेतली आहेत. वडाळा-मिशन स्टेशन कौन्सिलनें बरेंच पैसे मिळवून गोरगरिबांचे साह्य केलें आहे, मुलांमुलींची शिक्षणांत उन्नति केली आहे आणि रोग्यांस पुष्कळ मदत केली आहे.

रे. व मिसेस स्वार्ट रजेवर गेल्यामुळें रे. प्र. शि. भोसले हे राहुरी आणि वडाळा या दोन्ही प्रांतांचें काम पाहातात. त्यांनीं वडाळा प्रांतासाठीं साह्यकारी म्हणून खुद्द वडाळ्यांतील एक तरुण सेवक श्री. भा. र. शोणावळे बी. ए. बी. डी. यांस घेतलें आहे. रे. पटेकर

नंतर रे. जे. वाय. शिरसाठ यांनीं वडाळा–मिशन फेअरबँक मेमोरियल चर्चची आचार्य म्हणून दोन वर्षें सेवा केली.

अमेरिकन मराठी मिशनाचा इतिहास लिहिण्यास रे. मिस्. इ. एल्. वुड, मिसेस डब्ल्यू. क्यू. स्वार्ट, आणि रे. जे. एल्. मोल्टन या तिघांची एक कमिटी नेमली आहे. या दोन मिशनरी भगिनींचे कांहीं कारणामुळें येणें झाले नाहीं पण रे. जे. एल्. मोल्टन भारतांत आले आहेत आणि ते मिशनचा १५० वर्षांचा इतिहास लिहीत आहेत. अमेरिकन मराठी मिशननें केलेल्या कामास १२–२–१९६३ ला १५० वर्षे होतील. त्याप्रसंगासाठीं अमेरिकें–तील बोर्डाचे प्रेसिडेंट, सेक्रेटरी व कांहीं प्रतिनिधी हजर राहतील. त्यावेळीं मिशन कामाचा इतिहास वाचला जाईल. याशिवाय श्री. र. ह. केळकर, ज्ञानोदय संपादक, श्री. प्र. शि. भोसले, कार्याध्यक्ष, १५० वा महोत्सव आणि श्री. एस्. आर. पंडीत, मिशनचे खजिनदार यांनीं ज्ञानोदयांतून आणि स्वतंत्र पत्रिकांच्या द्वारें मिशन कामाचा इतिहास वेळोवेळीं लिहिला आहे. तो वाचल्यानंतर मोठें कार्य झालें आहे म्हणून परमेश्वराची उपकारस्तुति करूं या. डॉ. फेअरबँकसाहेबांचें चरित्र मिशन कामाचा एक भागच आहे. म्हणून या संक्षिप्त जीवन–चरित्राच्या द्वारें वाचक वर्गास व्यावहारिक आणि आत्मिक लाभ व्हावा आणि जें काम डॉ इ फेअरबँकसाहेबांनीं वडाळा–मिशन प्रांतांत केलें तेंच काम सध्यां करीत असलेले कामदार ( सेवक–सेविका ) विश्वासांत दृढ राहून देवराज्य वाढविण्यास आणि प्रगति पथावर असलेलें काम पूर्णपणें पार पाडण्यास सिद्ध होतील अशी आशा धरून हें संक्षिप्त चरित्र पुरें करितों.

**समाप्त**

शि. प्र. मंडळी म. न. द. ग्रंथालय 684

क्रि. प्र. मंडळी म. न. ट्र. वा. धर्मवीर ग्रंथसंग्रह
684

प्रकाशक:—
रे. दा. आ. पटेकर
जुनाबाजार, भिस्ती गल्ली,
अहमदनगर.

## प्रसिद्ध केलेली पुस्तकें

१. डॉ. ह्यूमकृत... ... ... **ख्रिस्त संदेश**
२. डॉ. इ. फेअरबँक यांचें भाषण ... **धर्मसंजीवन**
३. डॉ. इ. फेअरबँक यांची व्याख्यानें **उपासना**
४. ख्रिस्त जयंतीची व नववर्षाची भेट
५. ग्रामोद्धार वर्गाचा अहवाल
६. At The Master's Feet **प्रभुपदीं**
रुपांतर–प्रकाशक–बी. टी. बी. एस्.
७. खेड्यांतील महान् पाळक–ओवर्लीन
रुपांतर–प्रकाशक–बी. टी. बी. एस्.
८. एस्तेर राणीची कथा
९. रुथचें तारण

मुद्रक—श्री. रा. द. आडेप, राष्ट्रीय मुद्रणालय, माणिक चौक, अहमदनगर.